cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८१ | गुरूवार दि.११ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सायबर गुलामगिरीचे भयावह वास्तव

डिजिटल युगाने रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. आज जगातील कोणत्याही देशातील कंपनीसाठी घरबसल्या काम करणे शक्य झाले आहे. मात्र, या वाढत्या डिजिटल संधींसोबत फसवणुकीच्या नव्या पद्धतीही विकसित झाल्या आहेत. अलीकडे केंद्रीय अन्वेषण विभाग ( सीबीआय) ने उघडकीस आणलेल्या एका प्रकरणाने या धोकादायक वास्तवाकडे पुन्हा एकदा देशाचे लक्ष वेधले आहे.

# तिसऱ्यांदा कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना अटी लागू

## मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

दिल्ली । वृत्तसंस्था

**वारंवार कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी काही अटी टाकल्या असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. १० जून) स्पष्ट केले आहे. ज्यांना २०१७ आणि २०१९ मधील कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही, अशा शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी काही गोष्टींचा खुलासा केला. ते दिल्लीतून बोलत होते.**



शेतकरी कर्जमाफीसंदर्भात प्रसिद्धीपत्रकाद्वारे सर्व तपशील दिलेला आहे. आम्ही ५६ लाख शेतकऱ्यांची ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करत आहोत. यामध्ये ज्या लोकांनी यापूर्वी कर्ज घेतले आहे; जे थकित आहेत, अशा सगळ्या लोकांचा यात समावेश केला आहे. केवळ २०२० मध्ये ज्यांना कर्जमाफी मिळाली आणि जे पुन्हा थकित आहेत असे जे दाखवत आहेत; यांच्यासंदर्भात आम्ही मर्यादा टाकल्या आहेत. त्या शेतकऱ्यांची संख्या मोठी नाही. असे ९ ते १० लाख शेतकरी आहेत. त्यांनाही कर्जमाफी मिळणार असल्याचे मुख्यमंत्री पान २ वर

### “ राज्यात खतांची टंचाई जाणवणार

राज्यात निर्माण झालेल्या खत टंचाईबाबत त्यांनी महत्त्वाची माहिती दिली. राज्यात खतांचे साठे केले आहेत. तरीही काही प्रमाणात थोडी टंचाई जाणवेल, असा खुलासा फडणवीस यांनी केला. खतांच्यासंदर्भात आम्ही यावेळेस काही मर्यादा ठेवलेल्या आहेत. आपण खते आयात करतो. पण सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळे आता भरमसाठ आयात करता येणार नाहीत. आता जेवढी गरज आहे; तेवढीच खते आपल्याकडे असल्याचे ते म्हणाले. पण खतांचे कोणी साठे केले तर मोठी टंचाई निर्माण होईल. काही निकष तयार करण्यात आले आहेत. काही अटी–शर्ती ठेवल्या आहेत. जेणेकरुन आवश्यक तेवढेच खत शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. विशेषत: मिश्र खतांच्यासंदर्भात आवश्यकतेनुसार उपलब्धतता आहे. काही प्रमाणात थोडी टंचाई जाणवू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

# गोदावरीत बोट उलटल्याने दोन महिलांचा बुडून मृत्यू!

## प्रशासनाचा हालगर्जीपणा ; पुरुषोत्तमपुरीत क्षमतेपेक्षा जास्त भाविक बोटी मध्ये भरले

माजलगाव प्रतिनिधी

अधिक मासानिमित्त माजलगाव तालुक्यातील भगवान पुरुषोत्तमपुरी या पवित्र तीर्थक्षेत्री भाविकांची मोठी गर्दी होत असताना, प्रशासनाच्या अक्षम्य हलगर्जीपणामुळे एक अत्यंत भीषण आणि धक्कादायक दुर्घटना समोर आली आहे. पुरुषोत्तम देवाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना गोदावरी नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीरावर घेऊन जात असताना, क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांनी खच्चून भरलेली बोट दि १० जुन बुधवार रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास अचानक नदीपात्रात उलटली.या भीषण अपघातात दोन महिला भाविकांचापाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे,तर दुसरी एक ७५ वर्षांची वृद्ध महिला गंभीर जखमी झाली आहे. नदीपात्रात बोट पलटी होताच संपूर्ण परिसरात एकच मोठा आक्रोश आणि खळबळ उडाली.



पवित्र अधिक मास सुरू झाल्यामुळे पुरुषोत्तमपुरी येथे संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी आणि गोदावरी नदीत स्नानासाठी येत आहेत. नदी पान २ वर

### प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेचे सुरक्षा व्यवस्थेकडे संपूर्ण दुर्लक्ष

पुरुषोत्तमपुरीत प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेचे सुरक्षा व्यवस्थेकडे संपूर्ण दुर्लक्ष झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. अधिक मास सुरू झाल्याबरोबर पहिल्याच दिवशी म्हणजेच १९ मे रोजी माजलगाव शहरातील एका तरुणाचा याच पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांपूर्वी देखील भाविकांची एक बोट नदीपात्रात उलटली होती, परंतु सुदैवाने त्या वेळी जीवितहानी टळली होती आणि भाविकांना वाचवण्यात यश आले होते. सलग दोन दुर्घटना घडूनही जिल्हा प्रशासन, पोलीस आणि मंदिर समितीने बोटीतील प्रवाशांच्या जीवरक्षक जॅकेट आणि मर्यादित प्रवासी संख्येबाबत कोणतीही कडक नियमावली लागू केली नाही. याच शासकीय निष्काळजीपणामुळे दोन निष्पाप महिला भाविकाला आपला जीव गमवावा लागला असून, या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

# माजी मंत्री धनंजय मुंडे पुन्हा नव्या वादात !

## मराठा भवनसाठी दिलेल्या जागेबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार

बीड । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे आमदार आणि माजी मंत्री धनंजय मुंडे पुन्हा एका नव्या वादात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परळी येथे मराठा भवनासाठी देण्यात आलेल्या जागेवरून मोठा वाद निर्माण झाला असून, या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्यासह संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

श्री दत्त देवस्थान थोरले देवघर संस्थानचे अध्यक्ष योगेश गोस्वामी यांनी आरोप केला आहे की, मराठा भवनासाठी देण्यात आलेली २८ गुंठे जमीन ही संस्थानच्या मालकीची असून, तिचा बेकायदेशीरपणे ताबा देण्यात आला. या प्रकरणी मराठा समाजाची दिशाभूल करण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. १४ मे रोजी परळी येथे धनंजय मुंडे यांच्या हस्ते मराठा भवनाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम पान २ वर

## थोडक्यात...

### लंडनमध्ये दोन महिन्यांत मराठी भाषा केंद्र–उदय सामंत

मुंबई : भारतीय भाषा आणि साहित्याचा जगभरात प्रसार करणारे जागतिक मराठी भाषा केंद्र लंडनमध्ये पुढील दोन महिन्यांत सुरू केले जाईल, अशी माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. सामंत यांनी सांगितले की, मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्याचे काम वेगाने सुरू असून ही इमारत २०२७ पर्यंत तयार होईल. छत्रपती शिवाजी महाराज जागतिक मराठी भाषा केंद्र लंडनमध्ये पुढील दोन महिन्यांत सुरू केले जाईल. मराठी भाषा विभाग राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एका मराठी भाषा अधिकाऱ्याची नियुक्ती करेल. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर, संबंधित विभागाने रत्नागिरी, नाशिक, नागपूर, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती येथे मराठी भाषा विकास केंद्रे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही केंद्रे मराठी भाषेतील संशोधनाला चालना देण्यास मदत करतील. विद्यार्थी आणि संशोधकांना आवश्यक ती सर्व मदत पुरवली जाईल, अशी ग्वाही मंत्र्यांनी दिली.

### घरातून एकटी बाहेर पडलेल्या महिलेवर सामूहिक बलात्कार

बंगळूर: निर्भया कांडाने देश हादरवून सोडल्यानंतर अशाच पद्धतीची माणुसकीला काळिमा फासणारी घटना दावणगिरी जिल्ह्यातील चन्नगिरी तालुक्यात घडली आहे. पतीसोबत भांडण झाल्यानंतर घरातून एकटी बाहेर पडलेल्या महिलेवर १० जणांनी सामूहिक बलात्कार करून तो व्हिडिओही व्हायरल केला आहे. अत्याचार करणाऱ्या या दहाही जणांना अटक झाली आहे. ही घटना महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर उघडकीस आली. कर्नाटकाच्या दावणगिरी जिल्ह्यातील बसवपट्टण टाऊन पोलिस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला आहे. इस्त्री नागराज, नागराज, अर्जुन, बसवंत, कुंदूर मारुती, हेग्गा मारुती, मनू, जोगी सुनील, प्रदीप आणि मधु अशी या अटक केलेल्या १० संशयितांची नावे आहेत. सर्व संशयित १९ ते २९ या वयोगटातील असून, यलोडहळ्ळी गावचे आहेत.

### महाराष्ट्राचे दोन सुपुत्र उरीमध्ये शहीद


जम्मू–काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ झालेल्या एका भीषण आणि अचानक झालेल्या स्फोटात भारतीय लष्कराचे दोन जवान हुतात्मा झाले आहेत. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणारे हे दोन्ही वीर जवान महाराष्ट्राचे सुपुत्र होते. मंगळवारी उशिरा संध्याकाळी उरी येथील कमलकोट भागात नियंत्रण रेषेजवळ गस्त घालत असताना हा स्फोट झाला. या स्फोटात वीरमरण आलेल्या दोन्ही जवानांची ओळख पटली असून, वीर जवान विक्रम चव्हाण हे ऐरोली (नवी मुंबई) येथील रहिवासी होते. तर वीर जवान अर्जुन जाधव हे सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील शाहपूर गावचे रहिवासी होते. कमलकोट येथे मंगळवारी संध्याकाळी झालेल्या या स्फोटात दोन्ही जवान गंभीररित्या जखमी झाले होते. लष्कराच्या इतर सहकाऱ्यांनी तात्काळ बचाव मोहीम राबवून दोन्ही जखमी जवानांना उपचारासाठी श्रीनगरच्या बदामीबाग येथील ९२ बेस हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांच्या पथकाने त्यांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

# २० जूनला दिल्लीत पुन्हा आंदोलन!

## कॉकरोच जनता पार्टीचा केंद्र सरकारला इशारा; अभिजित दीपकेंची घोषणा

दिल्ली । प्रतिनिधी

नीट परीक्षा, शैक्षणिक व्यवस्थेतील कथित अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून चर्चेत आलेल्या कॉकरोच जनता पार्टीने पुन्हा एकदा मोठी घोषणा केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी २० जून रोजी दिल्लीत आणखी मोठे आंदोलन करण्यात येणार असल्याचे जाहिर केले आहे. या घोषणेमुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारवरील दबाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




दिल्लीतील जंतर–मंतर येथे ६ जून रोजी झालेल्या आंदोलनाला मिळालेल्या प्रतिसादानंतर अभिजित दीपके यांनी ही घोषणा केली. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, सध्या पुण्यातही आंदोलन सुरू असून त्यात पुणे विद्यापीठातील विद्यार्थी तसेच एमपीएससी आणि यूपीएससीची तयारी करणारे अनेक तरुण सहभागी झाले आहेत. लवकरच पुढील आंदोलनाची सविस्तर माहिती जाहीर करण्यात येईल, पान २ वर

# ‘नेहरू आणि पंतप्रधान मोदी यांच्यात तुलना होऊ शकत नाही’–शरद पवार

पुणे । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी बुधवारी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची प्रशंसा केली. राष्ट्र उभारणीतील त्यांचे योगदान आणि त्यांनी दिलेले बलिदान विसरता येणार नाही. तसेच, नेहरू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात तुलना होऊ शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम वाय. बी. चव्हाण सेंटरमध्ये झाला. यावेळी ते बोलत होते.**



पवार म्हणाले, पंतप्रधान मोदी हे सर्वाधिक काळ पदभार सांभाळणारे पंतप्रधान बनले आहेत आणि त्यांच्या तोडीचा दुसरा नेता नाही, असे चित्र निर्माण केले जात आहे. राष्ट्र उभारणी आणि पान २ वर

# आरएसएस मुख्यालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महापालिकांना बॉम्बच्या धमकीचे ईमेल; चौकशी सुरू



मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील नागरी प्रशासनाला बुधवारी नागपूरमधील आरएसएस मुख्यालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि मुंबई व पुण्यातील महापौर कार्यालयांना लक्ष्य करून बॉम्ब हल्ल्याच्या धमक्या देणारे ईमेल्स प्राप्त झाले, त्यामुळे काही ठिकाणी लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आणि सुरक्षा दलांनी शोधमोहीम राबवली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

नागपूरच्या महाल भागातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मृती भवन मुख्यालयात स्फोटक ठेवण्यात आल्याचा दावा करणारा ईमेल नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांना मिळाल्यानंतर पोलिसांमध्ये खळबळ उडाली. हा ई–मेल ‘‘खलिस्तान नॅशनल आर्मी’’संबोधणाऱ्या गटाच्या नावाने पाठविण्यात आला आहे. ई–मेलमध्ये विविध ठिकाणी आयईडी स्फोट घडवून आणण्याची धमकी देण्यात आल्याने पोलीस, दहशतवादविरोधी पथक आणि केंद्रीय सुरक्षा यंत्रणांनी तातडीने तपास सुरू केला आहे. धमकी मिळाल्यानंतर, सखोल शोधासाठी बॉम्ब शोधक आणि निकामी पथकाला (बीडीडीएस) तात्काळ घटनास्थळी पाठवण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच, पान २ वर

# सोनिया गांधीकडून ममतांना विलीनीकरणाची ऑफर

## थेट उपाध्यक्ष करण्याची दाखविली तयारी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांनी ममता बॅनर्जी यांनी थेट फोन करून तृणमूल काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. भाजपच्या राजकीय हल्ल्यापासून वाचण्यासाठी दोन्ही पक्षांनी एकत्र येण्याची विनंती सोनिया गांधी यांनी केली आहे.**



पश्चिम बंगालमधील राजकीय परिस्थिती अत्यंत नाजून बनली आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट होण्याची शक्यता निर्माण झाली असून आमदारांपाठोपाठ आता खासदार देखील ममतांची साथ सोडून भाजपच्या बोटीत जाऊन बसण्याची शक्यता आहे. तृणमूल काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये विलीन न केल्यास तृणमूलची देखील आपसारखी अवस्था करण्याची भाजपची खेळी असल्याचा इशारा सोनिया गांधी यांनी दिला आहे. सोनिया गांधी यांनी ममता आणि अभिषेक यांना काँग्रेस पक्षात मोठं पद देण्याची देखील ऑफर दिली आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये अभिषेक बॅनर्जी पान २ वर

### “ बंडखोर १९ खासदारांनी नावे समोर

तृणमूल काँग्रेसला आतापर्यंतचा सर्वात मोठा राजकीय धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. टीएमसीच्या एकूण २८ लोकसभा खासदारांपैकी तब्बल १९ ते २० खासदारांनी एकत्र येत माजी मुख्यमंत्री टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाविरोधात उघड बंड पुकारल्याचे समजते. या नाराज खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना एक अधिकृत पत्र सोपवून संसदेत स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, या बंडखोर गटाने केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याची घोषणा केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# सीईटीच्या विद्यार्थ्यांसाठी ३६ जिल्ह्यांत सहाय्यता केंद्र

मुंबई । प्रतिनिधी

सीईटी परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (सीएपी), शिष्यवृत्ती योजना तसेच विविध प्रवेश प्रक्रियांबाबत विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्यातच मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरू करण्यात आली असून, या केंद्रांच्या सेवेला बुधवार (१० जून) पासून सुरुवात झाली आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ४० केंद्रे उभारण्यात आली आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत या उपक्रमाचा आढावा घेण्यात आला. बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, सीईटी कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर तसेच जिल्हास्तरीय समन्वयक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१० जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९३.०० क्विंटल | २,०५१ | २,५०३ | २,२९७ |
| ज्वारी/हायब्रिड: १४४.५० क्विंटल | १,८५५ | ४,२१० | २,९६२ |
| मका/लोकल: ३.०० क्विंटल | २,०३३ | २,०३३ | २,०३३ |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ७६.५० क्विंटल | १,८०० | २,६५० | २,२६४ |
| मुग: २.०० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,३५० | ५,४५० | ५,४०० |

cmyk

## अग्रलेख

# सायबर गुलामगिरीचे भयावह वास्तव

डिजिटल युगाने रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. आज जगातील कोणत्याही देशातील कंपनीसाठी घरबसल्या काम करणे शक्य झाले आहे. मात्र, या वाढत्या डिजिटल संधींसोबत फसवणुकीच्या नव्या पद्धतीही विकसित झाल्या आहेत. अलीकडे केंद्रीय अन्वेषण विभाग ( सीबीआय) ने उघडकीस आणलेल्या एका प्रकरणाने या धोकादायक वास्तवाकडे पुन्हा एकदा देशाचे लक्ष वेधले आहे. परदेशातील आकर्षक नोकऱ्यांच्या आमिषाने भारतीय युवकांना दक्षिण-पूर्व आशियातील सायबर फसवणूक केंद्रांमध्ये पाठवले जात असल्याचे आरोप या तपासातून समोर आले आहेत.

प्राथमिक तपासानुसार, काही आरोपी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, मेसेजिंग ॲप्स आणि ऑनलाइन जॉब पोर्टल्सच्या माध्यमातून युवकांशी संपर्क साधत होते. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, डेटा एंट्री, कस्टमर सपोर्ट यांसारख्या क्षेत्रांमध्ये उच्च पगाराच्या नोकऱ्यांचे आश्वासन दिले जात होते. आकर्षक वेतन, मोफत निवास व्यवस्था आणि जलद करिअर प्रगती यांसारख्या गोष्टींचा उल्लेख करून अनेकांना परदेशात जाण्यास प्रवृत्त केले जात होते. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, काही युवकांना थायलंडमार्गे म्यानमार आणि कंबोडियासारख्या देशांमध्ये नेण्यात आले. तेथे पोहोचल्यानंतर त्यांची परिस्थिती पूर्णपणे बदलत असल्याचे अनेक अहवालांमधून समोर आले आहे. काही प्रकरणांमध्ये पासपोर्ट जप्त करणे, हालचालींवर निर्बंध आणणे आणि कठोर देखरेखीखाली काम करण्यास भाग पाडणे यांसारख्या बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. पीडितांच्या कथनांनुसार, त्यांना ऑनलाइन आर्थिक फसवणूक, बनावट गुंतवणूक योजना, क्रिप्टोकरन्सी स्कॅम किंवा रोमांस स्कॅमशी संबंधित कामांमध्ये सहभागी होण्यासाठी दबाव टाकला जात होता. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नाही. संयुक्त राष्ट्रसंघ तसेच विविध आंतरराष्ट्रीय संस्थांनी यापूर्वीही म्यानमार, कंबोडिया आणि लाओस या भागांमध्ये कार्यरत असलेल्या तथाकथित ''सायबर स्कॅम कंपाऊंड्स'' बाबत चिंता व्यक्त केली आहे. अनेक अहवालांनुसार, आशियातील विविध देशांतील नागरिकांना फसव्या रोजगाराच्या आश्वासनांद्वारे अशा केंद्रांमध्ये नेले जाते आणि त्यांच्याकडून बळजबरीने काम करून घेतले जाते. त्यामुळे या प्रकाराकडे केवळ सायबर गुन्हेगारी म्हणून नव्हे, तर आधुनिक मानव तस्करी आणि सक्तीच्या मजुरीच्या गंभीर स्वरूपात पाहिले जात आहे. या प्रकरणातून काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. पहिला प्रश्न म्हणजे बेरोजगारी आणि जलद आर्थिक प्रगतीच्या इच्छेचा गैरफायदा घेतला जात आहे का? अनेक युवक चांगल्या संधींच्या शोधात परदेशी नोकऱ्यांचा विचार करतात. परंतु पुरेशी पडताळणी न करता घेतलेले निर्णय त्यांना धोकादायक परिस्थितीत ढकलू शकतात. दुसरा प्रश्न म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्म्सवरील बनावट रोजगार जाहिरातींवर कितपत प्रभावी नियंत्रण आहे? सोशल मीडिया आणि ऑनलाइन नेटवर्किंगच्या युगात फसवणूक करणाऱ्यांना संभाव्य बळींपर्यंत पोहोचणे अधिक सोपे झाले आहे. या पार्श्वभूमीवर सरकार, तपास यंत्रणा, तंत्रज्ञान कंपन्या आणि नागरिक या सर्वांची भूमिका महत्त्वाची ठरते. परदेशी नोकऱ्यांसाठी काम करणाऱ्या एजन्सी आणि भरती प्रक्रियेवर अधिक कठोर देखरेख आवश्यक आहे. संशयास्पद जाहिराती आणि फसव्या नेटवर्क्सवर जलद कारवाई करण्यासाठी सोशल मीडिया कंपन्यांनीही अधिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तसेच, परराष्ट्र मंत्रालय, कायदा अंमलबजावणी संस्था आणि संबंधित देशांमधील यंत्रणांमध्ये अधिक प्रभावी समन्वय असणे गरजेचे आहे.

युवकांनीही काही मूलभूत खबरदारी घेणे आवश्यक आहे. कोणतीही परदेशी नोकरी स्वीकारण्यापूर्वी कंपनीची अधिकृत नोंदणी, रोजगार करार, व्हिसा प्रक्रिया आणि संबंधित सरकारी मान्यता यांची पडताळणी करणे अत्यावश्यक आहे. केवळ सोशल मीडिया संदेश, अनोळखी एजंट किंवा अविश्वसनीय वेबसाइट्सवर आधारित निर्णय घेणे टाळले पाहिजे. अत्यंत आकर्षक वाटणाऱ्या ऑफर्सकडे नेहमीच चिकित्सक दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे. सायबर गुलामगिरीचे हे प्रकरण डिजिटल युगातील एका नव्या आणि चिंताजनक वास्तवाची जाणीव करून देते. तंत्रज्ञानामुळे जग अधिक जोडले गेले असले तरी त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून शोषणाच्या नव्या पद्धतीही विकसित होत आहेत. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी, जनजागृती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य या तिन्ही गोष्टी समान महत्त्वाच्या ठरतात. आकर्षक नोकरीच्या आश्वासनामागे कधी कधी मानव तस्करी आणि सक्तीच्या मजुरीचे जाळे दडलेले असू शकते, ही जाणीव प्रत्येकाने ठेवण्याची गरज आहे. आधुनिक काळातील या नव्या स्वरूपाच्या गुलामगिरीविरुद्ध लढा देण्यासाठी समाजाने अधिक सजग, जबाबदार आणि सतर्क राहणे हीच काळाची गरज आहे.

# पुन्हा एकदा कागदोपत्री वृक्षलागवडीत बीड जिल्ह्याला पुरस्कार पटकावण्याची संधी; २९ लाख रोपे आहेत का?-डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यात यापूर्वी झालेल्या वृक्षलागवड मोहिमेतील दाव्यांबाबत अनेक प्रश्न अनुत्तरित असतानाच पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, ''पुन्हा एकदा कागदोपत्री वृक्षलागवड करून पुरस्कार पटकावण्याची संधी बीड जिल्ह्याला मिळाली आहे,'' अशी उपरोधिक टीका केली आहे.**

डॉ. ढवळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ७ ऑगस्ट २०२५ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली एका दिवसात ३० लाख वृक्षांची लागवड केल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात त्यापैकी १० टक्के झाडेदेखील आज जिवंत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या मोहिमेसाठी सुमारे ४२ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते, वृक्षप्रेमी व पर्यावरणप्रेमींनी अनेकदा चौकशीची मागणी करत आंदोलने केली. मात्र प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. दरम्यान, विधानसभेत आमदार चेतन तुपे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी बीड जिल्ह्यात एका दिवसात ३० लाख आणि एकूण ६३ लाख वृक्षांची लागवड झाल्याचे तसेच त्यापैकी ९६ टक्के वृक्ष जिवंत असल्याचे सांगितले होते. तर माहिती अधिकारांतर्गत मिळालेल्या माहितीनुसार ७० लाख वृक्ष लागवड झाल्याचे नमूद करण्यात आले असल्याचा दावा डॉ. ढवळे यांनी केला आहे.



''लागवड झालेल्या वृक्षांच्या संख्येबाबत विविध आकडे समोर येत असल्याने सरकारची दिशाभूल केली जात असल्याचा संशय निर्माण होतो,'' असे ते म्हणाले. राष्ट्रीय वन धोरण १९८८ च्या उद्दिष्टानुसार सन २०४७ पर्यंत राज्याचे वनाच्छादन व वृक्षाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी राज्यात ३०० कोटी वृक्षारोपण अभियान राबविले जात आहे. या अभियानांतर्गत बीड जिल्ह्यातही व्यापक वृक्षलागवडीची तयारी सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विविध विभागांना उपलब्ध जमिनीचे नियोजन करून वृक्षलागवड करण्याच्या सूचना दिल्या असून, लागवडीनंतर पुढील दहा वर्षे वृक्षांचे जतन व संवर्धन करण्यावर भर दिला जाणार असल्याचे सांगितले आहे. याच पार्श्वभूमीवर डॉ. ढवळे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, ''जिल्हा प्रशासनाकडे प्रत्यक्षात २९ लाखांहून अधिक रोपे उपलब्ध आहेत का?'' प्रशासनाच्या माहितीनुसार सामाजिक वनीकरण विभागाकडे २० लाख तर प्रादेशिक वन विभागाकडे ९.५० लाख अशी एकूण २९.५० लाख रोपे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच ''एक शाळा एक विद्यार्थी एक झाड'' हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची नव्हे तर प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचेही प्रशासनाकडून अधोरेखित करण्यात आले आहे.

# घाबरल्यावर हात-पाय का थरथरतात?- डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

**अनेकदा आपण पाहतो की, जेव्हा एखादी व्यक्ती घाबरते, तेव्हा तिचे शरीर वेगळ्या पद्धतीने प्रतिक्रिया देऊ लागते. ज्यामध्ये प्रामुख्याने हाता-पायांचा थरकाप सुटणे समाविष्ट आहे. भीतीमुळे अंगाला काटा येणे किंवा शरीर कापणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. जी लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत कोणाच्याही बाबतीत घडू शकते. वैज्ञानिक संशोधनानुसार, जेव्हा एखाद्या व्यक्तीला धोक्याची जाणीव होते, तेव्हा त्याच्या मेंदूतील '' (अमिग्डांला) हा भाग सक्रिय होतो. हा भाग सक्रिय होताच शरीर सक्रिय होऊन फाइट मोड म्हणजेच स्वतःचा बचाव करण्याच्या भूमिकेत जाते.**



भीती वाटल्यास शरीरात '' (ॲड्रेनालाईन) नावाच्या हार्मोनची पातळी झपाट्याने वाढते. या हार्मोनच्या वाढीमुळे हृदयाचे ठोके वेगाने पडू लागतात, श्वासोच्छवासाचा वेग वाढतो आणि स्नायूंमध्ये प्रचंड ताण निर्माण होतो. स्नायूंमधील याच अचानक वाढलेल्या ताणामुळे शरीर थरथरू लागते. हा थरकाप म्हणजे शरीर स्वतःला संभाव्य धोक्याश, लढण्यासाठी सज्ज करत असल्याचे लक्षण आहे. ज्यामुळे शरीरात प्रचंड ऊर्जा सक्रिय होते. जेव्हा भीतीचे प्रमाण खूप जास्त असते, तेव्हा मानसिक आणि शारीरिक प्रतिक्रिया अधिक तीव्र होतात. अशा वेळी जास्त घाम येणे, चक्कर येणे किंवा अस्वस्थता वाढणे यांसारखी लक्षणे दिसतात. काही परिस्थितींमध्ये लोक बेशुद्ध देखील होतात. जर कधी अशी भीती वाटली, तर घाबरून न जाता दीर्घ श्वास घ्यावा. मन शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा आणि सकारात्मक विचार करून परिस्थिती हाताळण्याचा निर्णय घ्यावा. एखाद्या व्यक्तीला जेव्हा तीव्र भीती वाटते, तेव्हा त्याचे शरीर एका विशिष्ट पद्धतीने प्रतिक्रिया देते. ज्यामध्ये शरीर थरकाप सुटणे ही सर्वात सामान्य बाब आहे. अशा वेळी मनावर ताबा ठेवणे किंवा मन शांत ठेवणे रामबाण उपाय आहे. तसे केल्यास तुम्हाला काही प्रमाणात दिलासा मिळतो. तुमचे हातपाय थरथरणे थांबते. स्वतःवर नियंत्रण ठेवण्यासाठी दीर्घ श्वास घेणे, मन शांत करणे आणि सकारात्मक विचार करणे आवश्यक असते, जेणेकरून पुढील निर्णय योग्य रीतीने घेता येतो. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# विद्यार्थ्यांनी जगाची गरज ओळखून करिअर निवडावे-प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल

## नेकनूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन मेळावा संपन्न

बीड । प्रतिनिधी

**आज जागतिक स्तरावर तंत्रज्ञान आणि रोजगाराची समीकरणे वेगाने बदलत आहेत. अशा काळात विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक वाटांवर न चालता, जगाची नेमकी काय गरज आहे' हे ओळखून आपल्या करिअरची दिशा निश्चित करावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले.**



नेकनूर येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ तथा करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम सोमवार, दि.८ रोजी डॉ.अब्दुल कलाम संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, नेकनुर येथे उत्साहात पार पडला. पुढे बोलताना डॉ. बांदल म्हणाले की, दहावी आणि बारावीनंतर केवळ मेडिकल किंवा इंजिनिअरिंग या क्षेत्रांचा विचार न करता माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, लॉ, मीडिया, फॅशन डिझायनिंग, गव्हर्नमेंट बँकिंग, सी.ए., इन्शुरन्स स्किल्स, टॅली, जीएसटी, एमपीएससी, यूपीएससी, हेल्थकेअर आणि नर्सिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअरच्या सुवर्णसंधी उपलब्ध आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या आधुनिक कौशल्यांकडे वळावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डी. डी. राऊत यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, मुलांनी नवनवीन करिअरच्या संधींकडे वळावे. पारंपारिक संधींपेक्षा आधुनिक संधींचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी आपले भवितव्य उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.प्रमोद वंजारे, सूत्रसंचालन प्रा.निखात शेख व प्रा.आयशा शेख यांनी केले तर आभार प्रा. ऋतुजा अजब यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीला प्रशिक्षित, कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याची गरज; अवैध धंद्यांवर कारवाईची जनतेची मागणी

बीड । प्रतिनिधी

**पुण्यातील कथित विषारी दारूकांडाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात अवैध दारू व्यवसायाविरोधात चिंता व्यक्त होत असताना, आष्टी तालुक्यातही हातभट्टी दारू, भेसळयुक्त ताडी आणि बनावट मद्यविक्रीबाबत नागरिकांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. तालुक्यातील विविध भागांमध्ये अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत असून, या प्रकारांना आळा घालण्यासाठी सक्षम आणि कठोर प्रशासकीय यंत्रणा कार्यरत होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आष्टी शहरासह ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी हातभट्टी दारू व अवैध मद्यविक्रीचे प्रकार सुरू असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी सार्वजनिक जागा, बाजार परिसर आणि इतर वर्दळीच्या भागांतही हे प्रकार सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. विशेष म्हणजे, या अवैध व्यवसायांमुळे तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकत असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचे आर्थिक आणि सामाजिक जीवन उद्ध्वस्त होत असल्याचेही सांगितले जात आहे. अवैध मद्यनिर्मितीमध्ये घातक रसायनांचा वापर होत असल्याच्या चर्चांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांचा आरोप आहे की, अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी पोलीस विभाग, नगरपंचायत प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी अधिक प्रभावीपणे काम करण्याची आवश्यकता आहे. आष्टी येथे उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय असूनही अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच संबंधित विभागांनी नियमित तपासणी मोहीम राबवून अवैध अड्ड्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. अवैध मद्यविक्री आणि हातभट्टी व्यवसायामुळे भविष्यात गंभीर दुर्घटना घडू शकते, त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, असे त्यांनी म्हटले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, आष्टी तालुक्यात कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी आणि अवैध धंद्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी सक्षम, धाडसी आणि प्रशिक्षित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करणे काळाची गरज बनली आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संयुक्त मोहीम राबवून अवैध दारू, गुटखा व इतर बेकायदेशीर धंद्यांचे समूळ उच्चाटन करावे, अशी जोरदार मागणी आता सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचे बळी जाण्याची वाट पाहण्यापेक्षा प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी भावना आष्टी तालुक्यातील नागरिक व्यक्त करत आहेत.

## पान १ वरून...

### तिसऱ्यांदा कर्जमाफीचा लाभ

फडणवीस यांनी सांगितले. मात्र, वारंवार ज्यांना २०१७ आणि २०२० मध्ये कर्जमाफी मिळाली आणि पुन्हा त्यांना २०२६ मध्ये कर्जमाफी दिली तर यातून बँकिंग व्यवस्था कोलमडेल. यामुळे बँकिंग व्यवस्था कोलमडून जाऊ नये आणि शेतकऱ्यालाही मदत मिळाली पाहिजे, म्हणून अशा शेतकऱ्यांपुरत्या काही अटी टाकल्या आहेत. ज्या अटींची ९९ टक्के शेतकऱ्यांना अडचण येणार नाही. बाकी सर्व शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्जमाफी देत आहोत. शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी देत आहोत, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

------------

### माजी मंत्री धनंजय

पार पडला होता. यावेळी संबंधित जागा मराठा भवनासाठी उपलब्ध करून देण्यात आल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, ही जमीन श्री दत्त देवस्थान संस्थानच्या मालकीची असल्याचा दावा संस्थानने केला आहे. या संदर्भात संस्थानने बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करत जमीन मालकीची कागदपत्रेही जोडली आहेत. वर्ग-२ इनामी जमीन असलेल्या या जागेचा संगनमताने आणि कथित बनावट कागदपत्रांच्या आधारे ताबा देण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संस्थानच्या वतीने परळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पोपट निगळ, नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, आमदार धनंजय मुंडे आणि इतर संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रशासनाने योग्य कारवाई न केल्यास न्यायालयीन लढा उभारण्याचा आणि हायकोर्टात दाद मागण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या आरोपांमुळे बीड जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, आता प्रशासन आणि संबंधित पक्षांकडून काय भूमिका घेतली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------------

### गोदावरी नदीत बोट उलटल्याने दोन

ओलांडण्यासाठी येथे बोटींची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, स्थानिक बोट चालकांकडून सुरक्षेचे कोणतेही नियम पाळले जात नसल्याचे या दुर्घटनेने उघड केले आहे. दि १० जुन बुधवार रोजी सकाळी या ठिकाणी भाविकांची अफाट गर्दी झाली होती. याचाच फायदा घेऊन बोट चालकाने बोटीच्या प्रत्यक्ष क्षमतेपेक्षा कित्येक पटीने जास्त भाविकांना बोटेमध्ये कोंबले. बोट नदीच्या मध्यभागात पोहोचली असता, वजनाचा तोल बिघडल्याने ती अचानक गोदावरीच्या खोल पात्रात पलटी झाली.बोट उलटताच बोटीतील महिला, पुरुष आणि लहान मुले पाण्यात बुडू लागली. बोट उलटल्याचे पाहताच किनाऱ्यावर उपस्थित असलेल्या स्थानिक मच्छीमार आणि पोहणाऱ्या तरुणांनी तात्काळ नदीपात्रात उड्या घेतल्या. त्यांनी पाण्यात बुडत असलेल्या अनेक भाविकांना शिताफीने सुखरूप बाहेर काढले. मात्र, दुर्दैवाने प्रणीला शेषराव राठोड (वय ५५,रा.लोणार,जि. बुलढाणा) यांच्या नाकातोंडात मोठ्या प्रमाणावर पाणी गेल्याने त्यांचा नदीतच गुदमरून मृत्यू झाला. तसेच आणखी एक अज्ञात महिला भाविकेचा देखील मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर तिसरी महिला सिंधुबाई अर्जुन मावळे (वय ७५, रा. महागाव,जि. वाशिम) या पाण्यात बुडाल्याने अत्यंत गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने नदीबाहेर काढून माजलगाव येथील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात (आय.सु.यु) मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

----------

### 'नेहरू आणि पंतप्रधान मोदी यांच्यात

स्वातंत्र्यलढ्यातील नेहरूंचे योगदान विसरता येणार नाही आणि त्याचा आदर केलाच पाहिजे. त्यांची तुलना इतर कोणाशीही होऊ शकत नाही. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्या दरम्यान नेहरूंनी अनेक वर्षे तुरुंगवास भोगला. पंतप्रधान मोदी हे देशाचे सर्वाधिक काळ कार्यरत राहिलेले पंतप्रधान बनल्याचा उल्लेख करत पवार म्हणाले, ही चांगली गोष्ट आहे. संसदीय लोकशाहीत पंतप्रधान हे घटनात्मक पद आहे आणि आपण त्याचा आदर केला पाहिजे. पण नेहरू हे नेहरूच आहेत आणि भारतीय जनता त्यांचे बलिदान विसरू शकत नाही. सत्ताधारी मंडळी शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार आणि महिलांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत आहेत, असे ते म्हणाले. देश अनेक समस्यांशी झुंजत आहे, असे सांगत त्यांनी देशाचे परराष्ट्र धोरणही समाधानकारक नसल्याचे नमूद केले.

-------------

### २० जूनला दिल्लीत पुन्हा

असेही त्यांनी स्पष्ट केले. दीपके म्हणाले की, कॉकरोच जनता पार्टीची सुरुवात झाल्यानंतर अनेकांनी हा केवळ सोशल मीडियावरील ट्रेंड असल्याचे म्हटले होते. प्रत्यक्षात कोणीही रस्त्यावर उतरून आंदोलन करणार नाही, अशी टीकाही करण्यात आली होती. मात्र ६ जून रोजी जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले. त्यामुळे हे केवळ ऑनलाइन आंदोलन नसून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठीचे आंदोलन असल्याचा दावा त्यांनी केला. यावेळी अभिजित दीपके यांनी देशभरातील पालकांनाही भावनिक आवाहन केले. ''तुमची मुलं सरकारला प्रश्न विचारत असतील, अन्यायाविरोधात बोलत असतील किंवा राजकारणावर मत व्यक्त करत असतील, तर त्यांना रोखू नका,'' असे ते म्हणाले. त्यांनी स्वतःच्या आईचाही उल्लेख केला. ''माझ्या आईलाही माझी काळजी वाटते. मला अटक होईल किंवा माझ्यावर हल्ला होईल, अशी भीती ती व्यक्त केली होती. पण कोणीतरी बोललं पाहिजे, प्रश्न विचारले पाहिजेत, हे मी तिला सांगितलं,'' असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना धीर देताना दीपके म्हणाले की, ''जर मी एकटाच आवाज उठवला तर तो दाबण्याचा प्रयत्न होऊ शकतो. पण लाखो विद्यार्थी एकत्र आले, तर त्यांचा आवाज कोणीही दाबू शकणार नाही. तुरुंगात जायची वेळ आली तर मी जाईन, पण विद्यार्थ्यांवर अशी वेळ येऊ देणार नाही.'' दरम्यान, २० जूनला होणारे आंदोलन हे यापूर्वीच्या आंदोलनांपेक्षाही मोठे असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणण्यासाठी आणि शैक्षणिक व्यवस्थेतील समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन महत्त्वाचे ठरेल, असेही त्यांनी सांगितले. आता २० जूनच्या आंदोलनाकडे विद्यार्थी, पालक आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून या आंदोलनाला किती प्रतिसाद मिळतो आणि त्याचे काय परिणाम होतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

---------------

### आरएसएस मुख्यालय, मुख्यमंत्री

कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही, असेही त्यांनी पुढे सांगितले. खबरदारीचा उपाय म्हणून सुरक्षा तपासणी अधिक कडक करण्यात आली होती आणि सर्व संवेदनशील भागांची तपासणी केली जात होती. मुंबईतील महापौर कार्यालय आणि मुख्यमंत्री कार्यालयासह अनेक ठिकाणी स्फोट होणार असल्याचा इशारा देणारे ईमेल बृहन्मुंबई महानगरपालिकेला मिळाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. महापालिकेच्या अनेक अधिकृत ईमेल आयडींवर पाठवण्यात आलेल्या या ईमेलमुळे सुरक्षा यंत्रणांनी तपास सुरू केला, असे त्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्या ईमेलमध्ये महापौर कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय, बीएसई इमारत आणि पालिका कार्यालयांमध्ये बॉम्बस्फोट घडवण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यामध्ये खलिस्तानचे संदर्भ होते आणि विविध संघटना व संस्थांना लक्ष्य करणारा प्रक्षोभक आणि धमकीवजा मजकूर समाविष्ट होता, असे बीएमसी अधिकाऱ्यांनी सांगितले. सारख्याच मजकुराच्या त्या ईमेलमध्ये असा दावा करण्यात आला होता की, दुपारी १.११ वाजता मुंबईच्या महापौरांच्या कार्यालयात स्फोट घडवण्यासाठी स्फोटके ठेवलेल्या कारचा वापर केला जाईल. त्यासोबतच, ठराविक वेळी बीएसई इमारत, सीएमओ आणि बीएमसी कार्यालयांना बॉम्बच्या धमक्या दिल्या गेल्याचाही माहिती आहे. पुण्यात महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाला आणि महापौरांच्या कार्यालयालाही बॉम्बस्फोटाची धमकी देणारा एक ईमेल मिळाला. संपूर्ण मुख्य प्रशासकीय इमारत रिकामी करण्यात आली आणि बॉम्ब शोधक पथकाकडून कसून तपासणी करण्यात आली, असे एका पालिका अधिकाऱ्याने सांगितले.

------------

### सीईटीच्या विद्यार्थ्यांसाठी

प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर विश्वासार्ह आणि अचूक माहिती सहज उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी वारंवार मोठ्या शहरांमध्ये जावे लागू नये, तसेच अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, तांत्रिक अडचणी दूर करणे आणि प्रवेशासंदर्भातील शंकांचे निरसन स्थानिक पातळीवरच व्हावे, यासाठी ही केंद्रे उपयुक्त ठरणार आहेत. राज्यातील ४० केंद्रांपैकी मुंबईत तीन, पुण्यात दोन आणि नागपुरात दोन केंद्रे असतील. सध्या २६ केंद्रांचे काम पूर्ण झाले असून सहा केंद्रे अंतिम टप्प्यात आहेत. उर्वरित आठ केंद्रेही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

-----------

### सोनिया गांधीकडून ममतांना

यांच्याविरूद्ध नाराजी असून, एक एक टीएमसी नेते ममतांची साथ सोडून बंडखोर गटाकडे जात आहेत. त्यामुळं ममतांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अशातच सोनिया गांधी यांनी ममता बॅनर्जी यांना मोठी ऑफर देखील दिली आहे. सोनिया गांधी यांनी ममतांना राष्ट्रीय उपाध्यक्ष करण्याची तसेच अभिषेक बॅनर्जीला महासचिव पदाची ऑफर दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ममता बॅनर्जी यांनी या ऑफरबाबत विचार करण्यासाठी काही दिवसांचा वेळ मागितला आहे. तृणमूल काँग्रेसचे एकूण २८ खासदार आहेत. त्यातील जवळपास २० खासदार बंडखोरीच्या तयारीत असून ते काकोली घोष यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात एनडीएला पाठिंबा देण्याची शक्यता आहे. याबाबतच्या हालचाली त्यांनी सुरू केल्या असून ओम बिर्ला यांना पत्र लिहून त्यांनी आमची वेगळी बसण्याची सोय करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. ११ जून २०२६



## थोडक्यात



### एमयुएचएसचा २८ वा वर्धापन दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग अँड जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण जिजामाता फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ.पॉलराज, नर्सिंग कॉलेजचे उपप्राचार्य प्रवीण कुमार, फिजिओथेरपी कॉलेजच्या उपप्राचार्या डिनजू मॅडम व कार्यालय अधीक्षक वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीत व राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर ध्वजवंदनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी शिंदे सर, इरफान पठाण सर, कुलकर्णी सर यांच्यासह दोन्ही महाविद्यालयांतील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कर्नाटकात दत्ता कांबळे यांचा गौरव सामाजिक कार्याची राज्याबाहेरही दखल

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा बीड जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव थेट कर्नाटक राज्यात करण्यात आला. कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील व्हीआयएनपी साखर कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी परमेश्वर हुली यांनी दत्ता कांबळे यांच्या जनहितासाठीच्या कार्याची दखल घेत त्यांचा उत्साहपूर्ण सत्कार केला.



समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करत लोकहिताची भूमिका घेणारे दत्ता कांबळे यांचे कार्य जिल्ह्याच्या सीमांपलीकडे पोहोचल्याचे या सन्मानातून अधोरेखित झाले. कर्नाटक राज्यात मिळालेला हा सन्मान त्यांच्या सामाजिक बांधिलकीची आणि लोकांमधील विश्वासाची पावती मानला जात आहे.यावेळी व्हीआयएनपी शुगरचे मुख्य शेतकी अधिकारी परमेश्वर हुली यांच्यासह राजेंद्र नाईक,विनोद, कल्याण भारस्कर,सतीश किरण,पुजारी, प्रकाश घडसे तसेच कारखाना प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.या सन्मानाबद्दल दत्ता कांबळे यांनी परमेश्वर हुली तसेच व्हीआयएनपी शुगर विभागाचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. त्यांच्या या गौरवाबद्दल तालखेड राखीव जिल्हा परिषद गटासह विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### केजच्या लेकीने जिंकले जग दुहेरी सुवर्णपदकांची ऐतिहासिक कामगिरी.!

केज : विधानसभा मतदारसंघातील जिवाचीवाडी येथील कु. हिंदवी परमेश्वर चौरे हिने वर्ल्ड योगासना चॅम्पियनशिपमध्ये दुहेरी सुवर्णपदक पटकावत देशाचा गौरव वाढविला आहे. ट्रेडिशनल ग्रुप आणि फॉरवर्ड बेंडिंग या दोन्ही प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तिने आपल्या असामान्य प्रतिभेची जगाला दखल घ्यायला भाग पाडले आहे. एका छोट्याशा गावातून जागतिक मंचापर्यंतचा तिचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. हिंदवीच्या या अभूतपूर्व यशाबद्दल तिचे, तिच्या कुटुंबियांचे, प्रशिक्षकांचे आणि जिवाचीवाडी ग्रामस्थांचे मनःपूर्वक अभिनंदन.!



# अंजनवतीतील नुकसानग्रस्तांना तहसीलदार शेळके यांचा दिलासा

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश मंडळ परिसरात महसूल प्रशासनाचा लोकाभिमुख आणि संवेदनशील चेहरा पुन्हा एकदा पाहायला मिळाला . रस्ते , जमीन हस्तांतरण , पंचनामे तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्त भागांची पाहणी करत प्रशासनाने विविध ठिकाणी भेटी देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर तातडीने कार्यवाही सुरू केली . महसूल विभाग केवळ कार्यालयापुरता मर्यादित नसून तो थेट नागरिकांच्या दारात पोहोचत असल्याचे चित्र या दौऱ्यातून दिसून आले .

अंजनवती येथे मुसळधार पावसामुळे काही घरांचे नुकसान झाल्याची माहिती मिळताच तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त कुटुंबीयांची विचारपूस केली . घरांची पडझड , पत्र्यांचे नुकसान , खते , बियाणे व गृहउपयोगी साहित्याचे झालेले नुकसान याची पाहणी करून पंचनामा प्रक्रिया तातडीने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या . शासनाच्या माध्यमातून आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला .

या पाहणी दौऱ्यात मंडळ अधिकारी उज्वला राऊत , तलाठी नारायण दराडे , डॉ . गणेश ढवळे , सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मोरे तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते . नागरिकांच्या समस्या समजून घेत त्यावर तत्परतेने उपाययोजना करण्याच्या प्रशासनाच्या भूमिकेचे ग्रामस्थांनी स्वागत केले. दरम्यान , बेलेश्वर वस्ती येथे नागरिकांच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी केली . अनेक



दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाची वस्तुस्थिती समजून घेत पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक निरीक्षणे नोंदवली . त्यानंतर मसेवाडी येथे गट क्रमांक १८३ मधील जमीन व विहीर हस्तांतरण प्रकरणाची वस्तुनिष्ठ पाहणी त्यांनी केली . लोणी घाट परिसरात गट क्रमांक १४४ , १४५ , १४७ व ३८७ मधील पंचनाम्यादरम्यान शेतकऱ्यांनी रस्त्याच्या हद्दीच्या खुणा स्पष्ट करण्याची मागणी केली . प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत अर्जदार संभाजी शहाजी कदम यांना पर्यायी रस्ता उपलब्ध करून देत समन्वयातून प्रश्न सोडविण्याचा मार्ग स्वीकारला. याच दौऱ्याहून परत येताना तहसीलदार शेळके यांनी मांजरसुंबा ससेवाडी रस्ता खुला करण्याच्या ठिकाणी भेट दिली . या ठिकाणी मंडळ अधिकारी सोनाली कदम - शेळके , ग्राम महसूल अधिकारी रेश्मा तानगे यासह गावकरी उपस्थित होते.विशेष म्हणजे बीड तालुक्यात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली महसूल प्रशासनाने मागील दीड वर्षांत विविध लोकाभिमुख उपक्रमांमधून उल्लेखनीय कामगिरी केली आहे . " छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान " अंतर्गत १६ समाधान शिबिरांमधून ७६८ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली . १२ हजार ९२ डिजिटल ७ / १२ उतारे , २ हजार ९५७ डिजिटल ८ अ उतारे , २ हजार ४८४ विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले . तसेच एक खिडकी योजनेअंतर्गत ९८ अर्जांचा निपटारा करण्यात आला . महसूल , आरोग्य , कृषी व सामाजिक योजनांशी संबंधित एकूण ३० हजार सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आल्या.अतिक्रमणमुक्त रस्ते मोहिमेतही बीड तहसील आघाडीवर राहिले असून ६४ प्रकरणांमध्ये १०० किलोमीटरहून अधिक लांबीचे अडविलेले शेतरस्ते मोकळे करण्यात आले आहेत . आहेर चिंचोली , वडगाव , नेकनूर , पिंपळनेर , चौसाळा , नागापूर , करंजगाव , बोरखेड , वानगाव , शिवणी यांसह अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांना प्रत्यक्ष रस्ते उपलब्ध करून देण्यात आले . त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले वाद मार्गी लागून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या समन्वयातून , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पाठपुराव्यामुळे तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या देखरेखीखाली महसूल प्रशासनाची कामे अधिक गतिमान झाली आहेत . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाने गावपातळीवर जाऊन प्रश्न सोडविण्याची कार्यपद्धती स्वीकारल्याने " शासन आपल्या दारी " ही संकल्पना प्रत्यक्षात उतरल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे . जनतेच्या अडचणींना संवेदनशीलतेने प्रतिसाद देणारे आणि संकटसमयी तातडीने धाव घेणारे प्रशासन हीच या दौऱ्याची खरी जमेची बाजू ठरली आहे,

## सारथी संस्थेच्या संशोधकांनी राबविली किल्ले धारूर येथे स्वच्छता मोहीम

बीड । प्रतिनिधी

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या अर्थात सारथीच्या वतीने बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले धारूर येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सारथीचे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील आणि उपव्यवस्थापकीय संचालक सुवर्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ६ आणि ८ जून २०२६ रोजी ही मोहीम पार पडली.

या मोहिमेदरम्यान एकूण सहा पी.एच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी किल्ला परिसरातून सुमारे ८ किलो प्लास्टिक आणि इतर कचरा गोळा केला.राजर्षी शाहू महाराजांची जयंती २६ जून रोजी असून, त्यानिमित्त सारथी संस्थेच्या वतीने २६ मे ते २५ जून २०२६ या कालावधीत विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात



आले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून १ ते ७ जून दरम्यान अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नजीकच्या गड-किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली होती.

धारूर किल्ल्यावर सकाळी ६ ते १० या वेळेत ही मोहीम राबविण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी किल्ला आणि परिसर पिंजून काढत ४ गोणी कचरा गोळा केला. यामध्ये प्रामुख्याने प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या आणि इतर टाकाऊ वस्तूंचा समावेश होता. संकलित केलेला सर्व कचरा धारूर प्रशासनाच्या सहकार्याने योग्य पद्धतीने नष्ट करण्यात आला. या मोहिमेत सारथी संस्थेच्या ६ पी.एच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या मोहिमेचे नेतृत्व गटप्रमुख रामेश्वर झोडगे आणि गटप्रमुख वैशाली घोलप यांनी केले. त्यांच्यासह इतर सदस्यांनी दिलेल्या योगदानामुळे ही मोहीम यशस्वीरित्या पार पडली. असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## गेवराईत युवा सेनेची बीएलए आढावा बैठक उत्साहात



गेवराई । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे साहेब, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेशभाई सरनाईक, युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे व युवा सेना सचिव किरणजी साळवे यांच्या आदेशानुसार तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक तथा बीड जिल्हा लोकसभा संपर्क प्रमुख बाजीराव चव्हाण साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत गेवराई येथे युवा सेना बी.एल.ए. आढावा बैठक मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

युवा सेना तालुकाप्रमुख बबन आप्पा मोघे यांच्या नियोजनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत संघटनात्मक कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच बूथस्तरावरील संघटन मजबूत करणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे, आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि पक्षाच्या विचारधारेचा प्रसार अधिक व्यापक करण्याबाबत उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी युवा सेना मराठवाडा निरीक्षक तथा बीड जिल्हा लोकसभा संपर्क प्रमुख बाजीराव दादा चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश भाऊ जाधव, युवा सेना जिल्हाप्रमुख शेखर पवार, युवा सेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके, युवा सेना तालुकाप्रमुख बबन आप्पा मोघे, युवा सेना विधानसभा प्रमुख सुरज भैय्या चुंगडे, युवा सेना विधानसभा संपर्क प्रमुख अंकुश मोरे, शिवराज उगले, शिवसेना शहरप्रमुख मुकेश अण्णा महाजन, शिवसेना विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, महादेव नाना मतकर, विक्रम भोसले, गणेश पवार यांच्यासह युवा सेनेचे पदाधिकारी व युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान संघटन विस्तार, बूथनिहाय मजबुतीकरण, युवकांचा पक्षातील सहभाग वाढविणे तसेच आगामी काळात पक्षाची ताकद अधिक वाढविण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पक्ष संघटना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. या बैठकीमुळे गेवराई तालुक्यातील युवा सेनेच्या संघटनात्मक कामकाजाला नवसंजीवनी मिळाल्याचे मत उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

## वीजपुरवठा, सौर पंप आणि ट्रान्सफॉर्मर प्रश्नांवर आ. सुरेश धस आक्रमक

### मतदारसंघातील उपकेंद्रे व ट्रान्सफॉर्मर तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, वीज ग्राहक व ग्रामीण भागातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत विविध प्रलंबित व महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली.**

यावेळी आष्टी तालुक्यातील दादेगाव, बीडसांगवी तसेच पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका येथे मंजूर झालेल्या नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांची कामे तातडीने पूर्ण करून कार्यान्वित करावीत, अशी मागणी त्यांनी केली. या उपकेंद्रांमुळे परिसरातील शेतकरी व वीज ग्राहकांना होणाऱ्या वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्या कमी होऊन वीजपुरवठा अधिक सुरळीत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच आष्टा हरिनारायण, पोखरी आणि संबंधित ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांवर



मंजूर झालेला नवीन ५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मर तातडीने बसविण्यात यावा, जेणेकरून परिसरातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने व अखंडित वीजपुरवठा मिळेल, अशी मागणीही त्यांनी केली.आष्टी मतदारसंघात जलसंधारण, शेततळे, सिंचन विहिरी, बंधारे तसेच विविध कृषी सिंचन योजनांमुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढली असून कृषी पंपांच्या वीज जोडण्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना आवश्यक विद्युत रोहित्रे उपलब्ध करून देऊन वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती आमदार धस यांनी केली.

यावेळी शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सौर कृषी पंप योजनांबाबतही चर्चा करण्यात आली. सौर पंपांची क्षमता, पाण्याचा दाब व शेतकऱ्यांच्या गरजा यामध्ये योग्य समन्वय साधून लाभार्थ्यांना अधिक प्रभावी सेवा मिळावी, यासाठी आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात आला. तसेच महावितरणच्या "ईडीबी ()" योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील वाढत्या वीज मागणीच्या अनुषंगाने ६३ केव्हीए क्षमतेच्या रोहित्रांऐवजी १०० केव्हीए व २०० केव्हीए क्षमतेची नवीन रोहित्रे उपलब्ध करून देण्याबाबतही सविस्तर चर्चा झाली. यासंदर्भात महावितरणचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, महापारेषण विभागाचे अधिकारी तसेच सौर पंप प्रणालीचे मुख्य कार्याधिकारी यांची संयुक्त बैठक लवकरच आयोजित करून शेतकऱ्यांच्या वीज व सौर पंपासंदर्भातील अडचणी दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात येतील, असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.




**टिप्पर चा कट लागून व टायर खालचा दगड उडून डोक्यात लागला स्व. महादेव रोमण यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले. या दुःखद घटनेनंतर आज संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी रोमण कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेत त्यांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला. यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांनी सांत्वन व्यक्त केले व संकटाच्या या कठीण प्रसंगी आपण त्यांच्या पाठीशी असल्याची भावना व्यक्त केली.**

## बाळाला ठेवून महिलेची कंकालेश्वर कुंडात उडी घेऊन आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील ऐतिहासिक कंकालेश्वर मंदिर परिसरात बुधवारी सकाळी एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली. १२ दिवसांच्या नवजात बाळाला घरी ठेवून एका महिलेने मंदिर परिसरातील कुंडात उडी घेतल्याने तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत असून परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माधुरी आनंद सोळुंके (वय ३९) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या मूळच्या पिंपळगाव कोलते येथील रहिवासी असून सध्या बीड शहरातील साई पार्क अपार्टमेंट येथे माहेरी मुक्कामी आल्या होत्या. बुधवारी सकाळी त्यांनी कंकालेश्वर मंदिर परिसरातील कुंडात उडी घेतल्याची माहिती समोर आली. घटनेची खबर मिळताच पेठ बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने महिलेचा मृतदेह कुंडातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. घटनेनंतर जिल्हा रुग्णालयात नातेवाईक आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. महिलेने हे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू असून सर्व बाजूंनी चौकशी केली जात आहे. या घटनेने विशेषतः नवजात बाळाच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

## प्रभू विश्वकर्मा उत्सव समितीच्या वतीने सुतार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

प्रभू विश्वकर्मा उत्सव समिती बीड मागील दोन वर्षापासून सामाजिक शैक्षणिक व धार्मिक कार्यात अग्रेसर ठरली आहे.समितीमार्फत दर महिन्याला विश्वकर्मा मंदिर तळेगाव येथे अमावस्या निमित्त अन्नदान व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.तसेच वेगवेगळे सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी बीड जिल्ह्याचे रहिवासी असलेल्या सुतार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व पुढील शैक्षणिक मार्गदर्शन करण्याचे आयोजन करण्यात आले आहे.रविवारदिनांक १४ जून २०२६ रोजी सकाळी अकरा वाजता तळेगाव येथील विश्वकर्मा मंदिरात हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

फेब्रु मार्च २०२६मध्ये इयत्ता दहावी व बारावी सर्व शाखेतील ७० टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे,एमपीएससी यूपीएससी व स्पर्धा परीक्षेतील उत्तीर्ण,विविध क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेले, शासकीय नोकरीत निवड झालेल्या, तसेच नव नियुक्त पोलीस पाटील, यासह सुतार समाजातील गुणवंतांचा प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह मान्यवराचे हस्ते देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे इयत्ता दहावी व बारावी मध्ये सर्वोच्च गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंतांना प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाची रोख पारितोषक आपल्या समाजातील प्रसिद्ध उद्योगपती गंगाधरावजी आगलावे अण्णा यांच्यावतीने देण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या दहावी व बारावी परीक्षेतील ७० %पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले गुणपत्रक आधार कार्ड झेरॉक्स प्रत व स्वतःचा पासपोर्ट फोटो समितीकडे दिनांक १२ /६ २०२०६ पर्यंत श्री अरुण कुंडलकर सर नाना यांचे कडे पाठवण्यात यावेत. त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व व्हाट्सअप नंबर ९४ २२ ७२ ० ८९८ असा आहे. दिनांक १२ ६ २०२६ पर्यंत प्राप्त होणाऱ्या गुणपत्रिकेतूनच प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक घोषित केले जातील. त्यानंतर आलेल्या व ऐनवेळी दिलेल्या गुण पत्रिकेचा विचार होणार नाही. बीड जिल्ह्यातील सुतार समाजातील विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व विद्यार्थ्यांच्या पालकांनी सर्व यशस्वी गुणवंतांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे प्रभू विश्वकर्मा उत्सव समिती बीडच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

## माजलगावात चढ्या भावाने खत विक्री

माजलगाव । प्रतिनिधी

येथील दत्त एजन्सी या खत विक्रेत्याकडून खताची चढ्या भावाने विक्री होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर कृषी विभागाने तपासणी करून संबंधित विक्रेत्यावर कारवाई केली. ही कारवाई कृषी अधिकारी मुनगिलवार यांच्या मार्गदर्शनाखाली दि १० जुन बुधवार रोजी करण्यात आली.

तपासणीत संबंधित खताची शासनमान्य किंमत सुमारे २७०० रुपये असताना शेतकऱ्यांना तेच खत ३४५० रुपयांना विक्री केल्याचे आढळून आले.यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे स्पष्ट झाल्याने कृषी विभागाने पंचनामा करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

या कारवाईचे भाई नारायण गोले (शेतकरी कामगार पक्ष) व तुकाराम नावडकर (तालुका अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, माजलगाव) यांनी स्वागत केले. तसेच शेतकरी सलीम खान पठाण व इतर शेतकऱ्यांनी दोषींवर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली. कृषी अधिकारी मुनगिलवार यांनी सांगितले की, खत, बियाणे व कृषी निविष्ठांची अवाजवी दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांनी अशा प्रकारच्या तक्रारी तात्काळ कृषी विभागाकडे नोंदवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. या कारवाईमुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत असून कृषी विभागाच्या भूमिकेचे स्वागत केले जात आहे.

## पान ६ वरून...

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी

मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ही समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी संबंधित मार्गाचे मोठ्या नाल्यासह चौपदरीकरण करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील विविध रखडलेल्या कामांच्या प्रगतीबाबतही चर्चा करण्यात आली. याशिवाय पायाभूत सुविधा, रस्ते विकास आणि इतर सार्वजनिक हिताच्या प्रश्नांसंदर्भातील निवेदनेही मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सादर करण्यात आल्याची माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

### माजलगांव शहर पोलीसांकडून

तपास करणे चालु आहे. सदरची कारवाई चेतना तिडके, प्रभारी पोलीस अधीक्षक बीड, ऋषीकेश शिंदे सहाय्यक पोलीस अधीक्षक अंबाजोगाई अतिरिक्त पदभार उपविभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड,पो.कॉ.महादेव बहिरवाळ, पो.कॉ महेश चव्हाण यांनी केली आहे.

### चकलांबा पोलिसांची अवैध

या संदर्भात चकलांबा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक १९०/२०२६ व १९१/२०२६ नोंदविण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) अंतर्गत कारवाई करण्यात आले आहेत. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कॉंवत, प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समिर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन इंगळे, पोह/बांगर, पोना/गुजर, पोलीस अंमलदार मुकेश बनसोडे, रमेश बारगजे, हनुमान इंगोले यांनी केली आहे.

### नागरिकांना त्रासदायक ठरत

वाहतूक शाखेने नागरिकांच्या दैनंदिन अडचणी ओळखून केलेल्या या तातडीच्या कारवाईचे शहरवासीयांकडून स्वागत होत असून, वाहतूक व्यवस्थापनासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल प्रभारी पोलीस निरीक्षक व अंमलदार यांचे कौतुक केले जात आहे

# मे व जून मधील पिक नुकसानीचा प्राथमिक अहवाल राज्य सरकारला प्राप्त

## लवकरच मिळणार नुकसानभरपाई

मुंबई : राज्यात मे आणि जून महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे शेती क्षेत्राला मोठा फटका बसला असून, तब्बल ५६ हजार ५३३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल राज्य सरकारला प्राप्त झाला आहे.

या नैसर्गिक आपत्तीचा फटका राज्यातील २४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना बसला आहे. यात फळबागा, भाजीपाला आणि विविध हंगामी पिकांचा समावेश आहे. अहवालानुसार, १ मे ते ८ जून २०२६ या कालावधीत २४ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा तडाखा बसला. या कालावधीत एकूण ५६ हजार ५३३ हेक्टर (१ लाख ४१ हजार ३३२ एकर) क्षेत्र बाधित झाले आहे.



१ जून ते ८ जून या आठ दिवसांच्या कालावधीतच १० जिल्ह्यांमध्ये १७ हजार ९३२ हेक्टर (४४ हजार ८३० एकर) क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. तर मेमधील नुकसानग्रस्त क्षेत्र ४० हजार २१५ हेक्टर (१ लाख ५२३ एकर) इतके नोंदविण्यात आले आहे. दरम्यान, महसूल आणि कृषी विभागाकडून नुकसानग्रस्त क्षेत्रांचे पंचनामे सुरू असून, अंतिम नुकसानभरपाईचा अहवालानंतर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

राज्यातील जळगाव, बुलढाणा, सोलापूर आणि अकोला हे जिल्हे सर्वाधिक प्रभावित ठरले आहेत. या भागात वादळी वारे, मुसळधार पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीमुळे उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः फळबागांना मोठा फटका बसला आहे. नुकसान झालेल्या पिकांमध्ये केळी, गहू, मका, हरभरा, ज्वारी, कांदा, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, संत्रा, द्राक्ष, केळी आणि आंबा यांचा समावेश आहे.

## ‘सोनपरी शेळी’ : या खास वैशिष्ट्यांमुळे आहे जास्त मागणी

भारतामध्ये शेळ्यांच्या अनेक जातींमध्ये सोनपरी शेळीची जात खूप लोकप्रिय आहे. या जातीच्या शेळीपालनातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक नफा मिळवता येतो.

सोनपरी शेळीची वैशिष्ट्ये : सोनपरी शेळी ही बेरारी शेळी आणि ब्लॅक बंगाल या दोन शेळीच्या संकराने तयार झाली आहे. या शेळीची खास गोष्ट म्हणजे या शेळीची कातडी चमकदार असल्यामुळे ही सोन्यासारखी दिसते त्यामुळे तिला सोनपरी असे म्हणतात. ही शेळी प्रामुख्याने मांसासाठी पाळली जाते. त्याच्या मांसाला बाजारात चांगली मागणी आहे.

शरीर रचना : सोनपरी जातीच्या शेळीचा रंग तपकिरी किंवा काळा असतो. त्याच्या मागच्या बाजूला डोक्यापासून शेपटीपर्यंत एक काळी रेष असते ज्यामुळे ती अधिक उठून दिसते. त्याच्या मानेवर एक काळे वर्तुळ असते. शेपटी मागे वक्र झालेली असते. कान पानाच्या आकाराचे असून खालच्या दिशेने वाकलेले असतात. शिंग चपटे असून बाहेरच्या बाजूस पसरलेले असतात. या शेळीचे वजन साधारणपणे ३५ ते ४० किलो असते. ही शेळी दरवर्षी ३ ते ४ पिलांना जन्म देते. त्यामुळे लहान पशुपालक अल्पावधीत या शेळीचे पालन करून लाखो रुपये सहज कमवू शकतात.

सोनपरी शेळीची किंमत : सोनपरी शेळीच्या मांसाला बाजारात चांगली मागणी असल्याने त्याची किंमतही बाजारात चांगली आहे. इतर शेळ्यांच्या तुलनेत सोनपरी बोकडाची बाजारातील किंमत २२ ते २५ हजार रूपयांपर्यंत आहे. अशा परिस्थितीत या शेळीचे पालनपोषण करून चांगले उत्पन्न मिळू शकते. सोनपरी शेळीची देखभाल : सोनपरी शेळीच्या देखभालीसाठी विशेष व्यवस्था करावी लागत नाही. घराच्या एका कोपर्यातही बांधून ठेवू शकता. ही शेळीही झाडाची पाने खाऊन जगते. याशिवाय फळे, भाज्या, हिरवे गवत इत्यादी खाते. सोनपरी शेळी उष्ण व कोरड्या हवामानात सहज राहू शकते.



## जपानी रेड डायमंड पेरुची अशी करा शेती

रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. आजकाल रेड डायमंड पेरू देशातील शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. जपानी रेड डायमंड पेरुचा दर खूप जास्त आहे, त्यामुळे अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.



लाल डायमंड पेरुची लागवड पद्धती : रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.

रोप लागवड आणि रोपातील अंतर : जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसऱ्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे. चांगल्या वाढीसाठी शेतकऱ्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

खत आणि सिंचन : रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

रेड डायमंड पेरू पासून होणारी कमाई : जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.

## जलद कंपोस्ट खत तयार करण्याचे तंत्रज्ञान

जर बायोडायनॅमिक तंत्रज्ञानाचा विचार केला तर हे मुख्यत्वेकरून भारतीय वेदांवर आधारीत जैवऊर्जा म्हणजेच बायोडायनॅमिक तंत्र होय. या तंत्रात ब्रम्हांडातील ग्रह तारे यांचा पृथ्वी वनस्पती आणि जलचरावर होणारा सकारात्मक परिणामांचा अभ्यास आणि विचार केला जातो. या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे या तंत्रज्ञानाच्या मदतीने कुठल्याही रासायनिक खतांचा किंवा इतर रासायनिक गोष्टींचा कुठल्याही पद्धतीचा वापर न करता कमी वेळेत उत्तम दर्जाचे कंपोस्ट या तंत्रज्ञानात तयार करता येते. या तंत्रज्ञानात प्रत्येकी अन्नघटकांचा जसं की नत्र, स्फुरद, पालाश इत्यादींचा वेगवेगळा विचार करण्याऐवजी सगळे अन्नद्रव्यांचा एकत्रित विचार केला जातो. शेणखत हे शेतीसाठी फार उपयुक्त आहे. परंतु सध्याच्या काळामध्ये जनावरांची संख्या आणि त्यांपासून शेणखताची उपलब्धता फार कमी झाली आहे. आणि जे काही उपलब्ध आहे ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे म्हणजेच त्यामध्ये गवऱ्या, तणाच्या बिया किंवा प्लास्टिक मिसळूनते एवढे उपयुक्त राहत नाही. परंतु बायोडायनॅमिक तंत्रज्ञानाने मूग उडीद आणि सोयाबीन यासारख्या कडधान्याच्या उपलब्ध काडाचे उपयोग कंपोस्ट तयार करण्यासाठी केला पाहिजे. अशा प्रकारचे कंपोस्ट हे बायोडायनॅमिक पद्धतीने कमी खर्चात आणि वेगाने करणे शक्य होते.

बायोडायनॅमिक कंपोस्टसाठी करावी लागणारी पूर्वतयारी : १) या पद्धतीमध्ये पीक अवशेषांचे थरावर थर रचले जातात. त्यापासून साधारणत: दोन अडीच महिन्यात कंपोस्ट तयार होते. जर या पद्धतीमध्ये थोडी पूर्वतयारी केल्यास वेळेची चांगल्याप्रकारे बचत होते. २) ज्या पिकांचे कंपोस्ट खत तयार करण्यासाठी थर द्यायचे आहेत अशा पिकांचे अवशेष चार-पाच दिवस पुरेसे ओले करावेत. जेणेकरून ते नरम होऊनजिवाणूंना काम करणे सोपे होते. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीनची काड, मुग, उडदाच्या शेंगांची टरफले त्वरित कंपोस्टसाठी वापरता येतात.ते चांगल्या प्रकारे व पूर्णपणे कुजतात. ३) त्याअगोदर एक बैलगाडी ओले शेन जमा करून ठेवावे. ४) कोणत्याही वनस्पती चा हिरवा पाला दोन बैल गाडा इतका जमा करून ठेवावा. ५) यामधील एक ढिगासाठी एक किलो बायोडायनॅमिक एस ९ हे विरजण स्वरूपात लागते.



६) यामध्ये कंपोस्ट तयार करण्यासाठी खड्डा खोदण्याची गरज नसते. शेतावरील उंचावरील सपाट जागा निवडून, पूर्व पश्चिम दिशेने पंधरा फूट लांब आणि पाच फूट रुंद अशी जागा आखून घ्यावी. त्या जागेवर पाणी शिंपडून चांगले ओले करावे. अगोदर शेणकाला तयार करून ठेवा एक किलो बायो डायनॅमिक एस ९ ही तेरा लिटर पाण्यात एक तासभर उलट सुलट पद्धतीने घोळून तयार करून ठेवावे. जशी आपली गरज असेल त्यानुसार ते जातीच्या पाण्यात टाकुन वाढविता येते.

थर कसे असावेत : पहिला थर अगोदर पुरेसे ओले केलेल्या पीक अवशेषांचा एक फूट उंचीचा असावा. त्यावर एस ९ द्रावण शिंपडून त्यावर पुरेसा शेन काला टाकावा. त्यानंतर या झाडावर हिरव्या झाडाचा पाला एक फूट उंचीपर्यंत पसरवून त्यावर एस ९ द्रावण शिंपडावे. शेनकाला टाकून शेतातील दोन घमेली माती पसरावी.अशा पद्धतीने पहिला थर तयार होतो. अशा पद्धतीने पाच फूट उंचीपर्यंत एकावर एक थर रचावेत. नंतर शेनकाला व माती मिसळून आणि उपलब्ध असल्यास गव्हांडा टाकून तयार केलेले मिश्रण हे ढीग पूर्णपणे जमिनीपर्यंत लिंपून घ्यावा.

उकरी करणे : एक महिन्यानंतर या ढिगाचा आकार लहान होतो. त्या वेळी पूर्ण ढीग फावड्याने उकरून सर मिसळ करून घ्यावे. त्यावर पुरेसे पाणी टाकून ओले करून पुन्हा शेनकाल्याने लिंपून टाकावे. यावेळी एस ९ टाकण्याची गरज नाही. अशा पद्धतीने एकूण साठ-सत्तर दिवसात दर्जेदार कंपोस्ट खत तयार होते. यामध्ये सर्व पीक अवशेषांचे कंपोस्ट तयार झालेले असते. जे पदार्थ नुसते शेणखतामध्ये कुजण्यासाठी आठ ते नऊ महिने लागतात.

या तंत्रज्ञानाने तयार झालेले कंपोस्ट खताचे फायदे : १) पंधरा फूट लांब व पाच फूट रुंद आकाराच्या ढिगातून साधारणात: दहा गंठण पूर्णपणे कुजलेले कुजलेले कंपोस्ट खत मिळते. मूग, उडीद शेंगांची टरफले सूर्यफुलाची काड इत्यादींची जाळून विल्हेवाट लावली जाते. त्याऐवजी त्यांचे कंपोस्ट केल्यास जमिनीमध्ये सेंद्रिय कर्ब वाढून जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २) बायोडायनॅमिक कंपोस्ट ढिगातून साधारणत: पिकांसाठी १८ ते २० किलो नत्र, उपलब्ध स्फुरद १८ ते २० किलो, पालाश दहा किलोपर्यंत मिळते. याबरोबरच गंध झिंक,कॅल्शियम, मॅग्नेशियम, अनिल लोह इत्यादी सूक्ष्म अन्नद्रव्ये ही मिळतात. ३) बायोडायनॅमिक हे कंपोस्ट पिकाच्या आवश्यकतेनुसार नायट्रोजन कंपोस्ट फास्फोरस, कंपोस्ट पोटॅश, कंपोस्ट आणि सल्फर कंपोस्ट असे म्हणतात. ४) या तंत्रज्ञाने कंपोस्ट तयार करण्यासाठी खड्डा खोदण्याची गरज नसल्याने सावली करतात. शेड उभारण्याचा खर्च येत नाही किंवा दररोज पाणी देणे व देखभालीची गरज सुद्धा येत नाही. ५) पूर्वतयारी केली असल्यास दोन मजूर एका दिवसात दोन ढीग बनवू शकतात. ६) पूर्णपणे तयार झालेल्या कंपोस्ट ढिगाखाली बऱ्याच वेळा शेतातील गांडूळ जमा झालेली दिसून येतात. जमिनीमधील जीवाणू व गांडुळांना संक्रिय करण्यास बायोडायनॅमिक कंपोस्ट मोलाचे कार्य करते. ७) एका ढिगातून साधारणत: दहा क्विंटल म्हणजेच ५० किलो वजनाची सुमारे २० पोती सेंद्रिय खत घरीच तयार होऊ शकते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.
१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.
१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.
१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.
१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.
१९०७ : नॉर्थनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.
१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.
१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.
१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.
१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.
१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.
१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.
१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.
१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.
१९८७ : १६० वर्षाच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.
२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.
२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
२००८ : भ्रष्ट्राचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)
१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.
१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)
१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.
१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.
१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.
१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.
१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.
१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.
१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.
१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन


३२३ई.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)
१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)
१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)
१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)
१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.
१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)
२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

cmyk




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

गुरूवार दि.११ जून २०२६ ५



# भूमिहीन शेतकरी पत्नीच्या खांद्यावरून उतरले जोखड...!

**लातूर जिल्ह्यातील बोंबळीच्या गायकवाड कुटुंबियांना मिळाला दिलासा**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संवेदनशीलता, प्रशासनाची तत्परता**

**वीज पडून दगावलेला बैल, आर्थिक सहाय्यासह, शेतकऱ्याला मिळाला बैल**

मुंबई। प्रतिनिधी

वीज पडून बैल दगावल्याने जोखडाला पत्नीला जुंपण्याची वेळ आलेल्या लातूर जिल्ह्यातील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्या व्यथेची दखल थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, अन्? या शेतकरी कुटुंबाला अवघ्या काही तासात बैल आणि दगावलेल्या बैलाच्या नुकसान भरपाई पोटीची रक्कम मिळाली. यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे निर्देश आणि जिल्हा प्रशासनासोबतच, अन्य विभागांनी दाखवलेली संवेदनशीलता चर्चेची ठरली आहे. या संवेदनशीलतेमुळे आता काशिनाथ गायकवाड यांना पत्नीला बैलाच्या जागी जूंपावे लागणार नसल्याने, या कष्टकरी कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला.

लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्दचे काशिनाथ गायकवाड भूमिहीन शेतकरी. त्यांच्याकडे असलेल्या बैलजोडीच्या



मदतीने श्री. गायकवाड व त्यांच्या पत्नी सौ. हौसाबाई परिसरातील शेतकऱ्यांची जमीन कसतात. मशागतीची, नांगरणी ते पेरणी, वखरणी अशी मिळेल ती कामे करतात, यावरच त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. यातच त्यांच्यावर दुर्दैव ओढवले. त्यांच्याकडील एका बैलाचा शुक्रवारी (५ जून) झालेल्या वादळी पावसात वीज पडून मृत्यू झाला. त्यामुळे मिळालेली कामे पूर्ण करण्यासाठी, श्री. गायकवाड यांना पत्नी सौ. हौसाबाई यांना जुंपावे लागल्याचे वृत्त मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यापर्यंत पोहचले. यावर त्यांनी मुख्यमंत्री सचिवालयाला तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानुसार प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्या संपर्कात राहून, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांना महसूलसह, सर्व यंत्रणांना श्री. गायकवाड यांना तत्काळ मदत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तहसिल कार्यालयासह, पशूसंवर्धन, कृषी सर्व यंत्रणा श्री. गायकवाड यांच्यापर्यंत पोहचल्या. पशूसंवर्धन विभागाने प्रयत्नपूर्वक एक बैल उपलब्ध करून घेतला आणि तो जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड, तहसिलदार सोमनाथ वाडकर यांच्यासह पशूसंवर्धन विभागाचे अधिकारी आदींच्या उपस्थितीत थेट गायकवाड कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आला. यामुळे काशिनाथ गायकवाड यांच्यासर, त्यांच्या कुटुंबियांच्या चेहऱ्यावर समाधान पसरले.मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी तातडीने दखल घेत, बैल मिळवून दिल्याने गायकवाड यांच्या पत्नी सौ. हौसाबाई आणि मुलगा पुंडलिक यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासह, जिल्हा प्रशासनाचेही आभार मानले. सौ. हौसाबाई म्हणाल्या, आमच्या एका बैलाचा वीज पडून मृत्यू झाल्याने दुर्दैवाने आमच्यावर अशी वेळ आली. पण आमच्या अडचणीची दखल घेऊन, लगेचच मदत मिळाल्याने बरे वाटले. आता पुढे येणाऱ्या खरीप हंगामासाठी मिळालेली कामे पूर्ण करण्याची चिंता दूर झाली. बैल पण चांगला मिळाला आहे. आता त्याची पण चागंली काळजी घेऊ आणि मिळालेली कामे देखील चांगली होतील असे बघू. नैसर्गिक आपत्तीमध्ये जनावरांचा मृत्यू झाल्यास राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून तातडीने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. श्री. गायकवाड यांच्या दगावलेल्या बैलाचा तातडीने पंचनामा आणि शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून नियमानूसार आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. ही रक्कम श्री. गायकवाड यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

## भीषण पाणीटंचाईच्या काळात बाबासाहेब शेळके ठरले डोमेगावसाठी आधार

**महिलांची पाण्यासाठीची पायपीट थांबली**





अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील डोमेगाव येथे यंदा पुन्हा एकदा भीषण पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असून गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.गावातील सामुदायिक पाणीपुरवठा विहिरीने तळ गाठल्याने नळयोजना ठप्प होण्याच्या मार्गावर आली होती.परिणामी महिलांना आणि नागरिकांना एक ते दीड किलोमीटर अंतरावरून डोक्यावर पाण्याची भांडी वाहून आणण्याची वेळ आली होती.दिवसेंदिवस वाढणाऱ्या उन्हाच्या तीव्रतेमुळे आणि भूजल पातळी खालावल्यामुळे गावातील पाणीप्रश्न अधिकच गंभीर बनला होता.

अशा कठीण परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत बाबासाहेब शेळके यांनी पुढाकार घेत गावकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.मागील वर्षीही डोमेगावला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागला होता.त्यावेळी गावातील पाण्याची समस्या सोडवण्यासाठी त्यांनी गलाटी नदीपात्रात दोन बोअरवेल घेतल्या होत्या.त्या बोअरवेलवर विद्युत पंप बसवून तेथील पाणी ग्रामपंचायतीच्या सामुदायिक पाणीपुरवठा विहिरीमध्ये सोडण्याची व्यवस्था करण्यात आली होती.या उपक्रमामुळे विहिरीतील पाणीसाठा वाढला आणि नळयोजनेद्वारे गावकऱ्यांना पाणीपुरवठा करणे शक्य झाले होते.त्यामुळे मागील वर्षी गावाची पाण्याची गरज मोठ्या प्रमाणावर भागली होती. यंदाही पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र झाल्यानंतर बाबासाहेब शेळके यांनी कोणतीही शासकीय मदत न मिळता स्वतःच्या प्रयत्नातून उपाययोजना सुरू केल्या.त्यांनी उसनवारी करून विद्युत पंप खरेदी केला आणि गलाटी नदीतील दोन्ही बोअरवेलचे पाणी पुन्हा सामुदायिक विहिरीत सोडण्याची व्यवस्था केली.त्यानंतर विहिरीतील पाणी नळयोजनेद्वारे गावात वितरित करण्यात येऊ लागले.या प्रयत्नांमुळे अनेक दिवसांपासून पाण्यासाठी भटकंती करणाऱ्या महिलांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या डोक्यावरून पाण्याचे हंडे वाहून नेण्याची कसरतही थांबली आहे. डोमेगावमध्ये निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या संकटात बाबासाहेब शेळके यांनी केलेल्या या कार्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.गावातील नागरिकांकडून त्यांच्या सामाजिक जाणीवेचे आणि लोकहितासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात येत आहे.दरम्यान,डोमेगावसह परिसरातील गावांचा कायमस्वरूपी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शासन व प्रशासनाने दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची गरज असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

## छत्रपती मल्टीस्टेट सोसायटी प्रकरणी आरोपीची संख्या तीन;आर्थिक गुन्हे शाखेची कामगीरी

जालना । प्रतिनिधी

मा. पोलीस अधिक्षक तेघबीर सिंह संधू यांचे आदेशाने छत्रपती मल्टीस्टेट सोसायटी यावर धडाकेबाज कारवाई दोन आरोपी नंतर परत अजून एक आरोपी अटक करण्यात आला. सदर तपास आर्थिक गुन्हे शाखा हे करीत आहे. गुन्हयाची थोडक्यात सविस्तर माहिती अशी की छत्रपती मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन संतोष भंडारी व संचालक आणि बँकेचे मॅनेजर यांनी जास्त व्याजदर देण्याचे आमीष दाखवुन खातेदारांना ठेवि ठेवण्यास प्रवृत्त करुन ठेवी मोठ्या प्रमाणावर झाल्यावर ठेविदारांच्या ठेवी परत दिल्या नाही. चेअरमॅन संतोष बसवंत भंडारी रा. छत्रपती संभाजीनगर (कायमचा पत्ता रा. ता. गेवराई जि. बीड) यांच्या २१ शाखा असुन शाखेच्या माध्यमातुन छ. संभाजीनगर, बीड, तिसरा आरोपी किरण अरुण तौर वय ३० वर्षे, रा. टाकरन ता. माजलगाव जि. बीड यांचा सक्रीय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास आज दिनांक ९/६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यामध्ये विविध प्रकारे मोठ्या प्रमाणात लोकांची फसवणुक केलेली आहे. चेअरमन ग्राहकांच्या स्वतःहुन घरी जावुन डिपॉजिट करण्यास प्रवृत्त करुन मोठ्या प्रमाणावर फिर्यादी व इतर गुंतवणुकदार यांची आर्थिक फसवणुक केल्या बाबत दिलेल्या सविस्तर तक्रारी वरुन गुन्हा दाखल आहे. गुन्हयात फिर्यादींची व साक्षीदारांची अशी १ कोटी, ३१ लाख, ४४ हजार रुपयांची छत्रपती मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन संतोष बसवंत भंडारी व संचालक आणि बँकेचे मॅनेजर यांनी फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे. १) राजीव सतीशराव काळे वय ४० वर्षे राहणार धनगर गल्ली गेवराई जिल्हा बीड २. विठ्ठल पांडुरंग रुचके वय ४७ वर्षे राहणार सिरसदेवी तालुका गेवराई जिल्हा बीड यांचा सक्रीय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना आज दिनांक ८/६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. कशी असते सर आरोपी आज किरण अरुण तौर वय ३० वर्षे, रा. टाकरन ता. माजलगाव जि. बीड यांचा सक्रीय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास आज दिनांक ९/६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. मा. श्री. तेघबीर सिंह संधू पोलीस अधीक्षक जालना, श्री. विक्रम साळी अपर पोलीस अधीक्षक यांच्या आदेशावरून आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस पुढील तपास करीत आहे.

## सोमवारी रात्री पाऊस सुरू होताच अर्धे शहर अंधारात

जालना/ प्रतिनिधी

जालना शहरात पावसाळ्याची सुरुवात झाली असली तरी उकाड्याचा त्रास कायम आहे. दिवसाचे तापमान ४१ अंशांच्या पुढे आहे. किमान तापमान २८ अंशांच्या वर आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशातच किरकोळ पाऊस सुरू होताच वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रकारांत वाढ झाली आहे. सोमवारी दिवसा पाऊस नसतानाही बहुतांश भागातील वीज गुल होती. रात्री पाऊस सुरू होताच ९.३० ते १ वाजेपर्यंत अर्धे शहर पुन्हा अंधारात बुडाले. असे प्रकार वारंवार होत असल्याने जालनेकरांकडून संताप व्यक्त होत आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील विविध भागांमध्ये वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे.सोमवारी शहरातील अनेक भागांत तासन्?तास वीजपुरवठा खंडित होता.भोकरदन नाका, संभाजीनगर, बसस्थानक परिसरात सकाळी सुमारे १० वाजता गेलेली वीज दुपारी ४ वाजल्यानंतर सुरू झाली. त्यामुळे व्यापारी, व्यावसायिक, घरगुती ग्राहकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. त्यानंतर रात्री साडेनऊच्या सुमारास पावसाला सुरुवात होताच पुन्हा अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला. विद्युत तारांमधील आलेल्या झाडांच्या फांद्या कापल्या जात आहेत. पाऊस सुरू होण्यापूर्वीच वीज गुल होते. नंतर अनेकवेळा फोन करूनही प्रतिसाद दिला जात नाही. स्टोअरमध्ये मटेरियल नाही, असे कर्मचारी खासगीत सांगतात. त्यामुळे थातुरमातूर उपाय करून वीज जोडली जात आहे. यात अधिकाऱ्यांचेही दुर्लक्ष होत आहे.

## पैठणमध्ये जलसमाधी आंदोलन!

**वाळू तस्कर आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांविरोत नागरिकांचा एल्गार**

संभाजनगर / प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील घरकुल योजनेच्या नावावर वाळूचा काळाबाजार करणाऱ्या विरुद्ध व वाळू तस्करांना सहकार्य करणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करावी. या मागणीसाठी सोमवारी (दि.८) सकाळी अकरा वाजताच्या दरम्यान पैठण ते शेवगाव मार्गावरील पाटेगाव गोदावरी नदीत विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जलसमाधी आंदोलन केले. या आंदोलनामुळे गोदावरी नदीत मोठा पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला आहे.

पैठण तालुक्यातील पाटेगाव, चनकवाडी, हिरडपुरी येथील गोदावरी नदीतून अवैधरित्या घरकुल योजनेच्या नावाखाली दिवसाढवळ्या हजारो ब्रास वाळू उत्खनन करून घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना वाटप करण्यात येत असल्याचे प्रशासनाने जाहीर केले. तरीही प्रत्यक्षात मात्र दररोज रात्री व दिवसा पैठण तहसीलदार व महसूल पथकातील अधिकारी, कर्मचारी यांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणावर वाळूचा काळाबाजार सुरू आहे. या वाळू तस्करांना सहकार्य करणारे संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याच्या मागणीसाठी विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाटेगाव येथील गोदावरी नदीत जलसमाधी आंदोलन सुरू केले. यावेळी नायब तहसीलदार राहुल बनसोडे, मंडळ अधिकारी कल्पना शेळके, तलाठी शितल झिरपे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे,उपनिरीक्षक संभाजी खाडे, राम बाराहाते, जमादार राजेश आटोळे उपस्थित असून पाण्यात आंदोलन करणारे अनिल राऊत, रामेश्वर बावणे, भगवान सोरमारे, सुभाष नवथर, शुभम काळे, शिवाजी साबळे उपस्थित होते. जोपर्यंत तहसीलदार, जिल्हाधिकारी आंदोलन स्थळी येत नाहीत तोपर्यंत आंदोलन समाप्त होणार नाही अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

## ऑनलाइन खरेदीत ग्राहकांची फसवणूक चिंताजनक

**डार्क पॅटर्न्स विरोधात जनजागृती करणार-सतीश पंच**

जालना। प्रतिनिधी

'डेटम इंटेलिजन्स' या बाजार संशोधन संस्थेने जाहीर केलेल्या 'डार्क पॅटर्न्स इन इंडियाज ऑनलाइन मार्केट्स' या अहवालातील आकडेवारी अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक असून ऑनलाइन कंपन्यांकडून वापरल्या जाणाऱ्या 'डार्क पॅटर्न्स' विरोधात देशोदेशीच्या ग्राहकांना दिशाभूल करणाऱ्या डिझाईन्समुळे देशातील ग्राहकांना वर्षाला तब्बल २५ ते २८ हजार कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवर, कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे राज्य उपाध्यक्ष तथा जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांनी तीव्र चिंता व्यक्त केली असून, डार्क पॅटर्न्स' विरोधात ग्राहकांनी आणि स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये व्यापारी महासंघाच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार असल्याचे म्हटले आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सतीश पंच यांनी म्हटले आहे की, सदरील अहवालानुसार, देशातील एकूण ३० कोटी ४० लाख ऑनलाइन खरेदीदारांपैकी तब्बल



८८ टक्के ग्राहकांना छुप्या शुल्काचा आणि सक्तीच्या नियमांचा मोठा फटका बसत असून ड्रिप प्राईसिंग, सक्तीचे अॅड-ऑन्स, खोट्या आणीबाणीचे नियम आणि सबस्क्रिप्शन ट्रॅप्स यांसारख्या फसव्या पद्धतींमुळे ग्राहकांना दरमहा सरासरी ७८ ते ८७ रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. विशेष म्हणजे, ६३ टक्के युजर्सना खरेदीच्या अंतिम टप्प्यात छुप्या शुल्काचा किंवा ड्रिप प्राईसिंगचा अनुभव येत असून डिजिटल क्षेत्रातील अशा फसव्या पद्धतींना आळा घालण्यात सध्याच्या नियामक हस्तक्षेपांना आतापर्यंत मर्यादित यश आले आहे.

या गंभीर मुद्द्यावर सतीश पंच यांनी स्पष्ट केले की, ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर ग्राहकांच्या संमतीशिवाय किंवा त्यांना अंधारात ठेवून अतिरिक्त शुल्क आकारणे हा ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा प्रकार आहे. आधीच कोरोनानंतर स्थानिक किरकोळ व्यापारी मोठ्या संघर्षातून जात असताना, दुसरीकडे ऑनलाइन कंपन्या अशा अनैतिक मार्गांचा वापर करून ग्राहकांची लूट करत आहेत आणि बाजारपेठेतील निरोगी स्पर्धेला बाधा आणत आहेत. डिजिटल क्षेत्रातील अशा फसव्या पद्धतींना आळा घालण्यात सध्याच्या नियामक हस्तक्षेपांना मर्यादित यश आले आहे, हे या अहवालावरून स्पष्ट होते, त्यामुळे सरकारने अशा प्लॅटफॉर्म्सवर कठोर कायदेशीर कारवाई करणारी यंत्रणा अधिक सक्षम करावी. स्थानिक व्यापारी ग्राहकाला प्रत्यक्ष वस्तू दाखवून, पारदर्शकतेने व्यापार करतो आणि तिथे कोणत्याही प्रकारचे छुपे शुल्क किंवा सक्तीचे नियम नसतात, त्यामुळे ग्राहकांनी ऑनलाईनच्या अशा भुलथापांना बळी न पडता स्थानिक बाजारपेठेला प्राधान्य देणे गरजेचे आहे. जालना व्यापारी महासंघ आणि 'कॅट'तर्फे लवकरच ग्राहकांमध्ये या 'डार्क पॅटर्न्स' आणि ऑनलाईन होणाऱ्या फसवणुकीबद्दल व्यापक जनजागृती मोहीम हाती घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अहवालातील काही प्रमुख धक्कादायक निष्कर्षांवर प्रकाश टाकताना असे समोर आले आहे की, वर्ष २०२४ मध्ये छुपे शुल्क आकारण्याचे हे प्रमाण ५२ टक्के होते, ज्यामध्ये आता वाढ झाली असून मूल्यमापन केलेल्या प्लॅटफॉर्म्सपैकी ७३ टक्के प्लॅटफॉर्म युजर्सवर सक्तीची कारवाई करणारी यंत्रणा वापरतात, ज्यामुळे युजर्सना त्यांच्या इच्छेविरुद्ध कृती करावी लागते. या अभ्यासासाठी ई-कॉमर्स, क्विक कॉमर्स आणि ऑनलाइन ट्रॅव्हल क्षेत्रातील १२ आघाडीच्या प्लॅटफॉर्म्सचे विश्लेषण करण्यात आले होते. या वाढत्या डिजिटल फसवणुकीमुळे आता ग्राहकांनी ऑनलाईन पेमेंट करताना किंवा खरेदीची अंतिम प्रक्रिया पूर्ण करताना अत्यंत सावध राहणे गरजेचे झाले आहे, असे सतीश पंच यांनी म्हटले आहे.

## वाटुर ते मंठा दिंडी महामार्गावर भेगा पडल्याने अपघाताचा धोका वाढला



मंठा

वाटुरफाटा ते मंठा या दिंडी महामार्गावर मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्याने संबंधित विभागाकडून पॅचअपचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्यामुळे हा महामार्ग भविष्यात अपघाताला निमंत्रण ठरणार आहे. मे. आर बी घोडके कंट्रक्शन कंपनीने केलेल्या वाटुर ते मंठा दिंडी महामार्गावर मोठ्या प्रमाणावर भेगा पडल्याने दररोज अपघात होत आहेत. यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला असून काहींना अपघातामुळे अपंगत्व सुद्धा आले आहे. काम पूर्ण होऊन अवघे दोन ते तीन वर्ष सुद्धा उलटले नाहीत मात्र, या महामार्गावर खड्डे व महाकाय भेगा पडल्या आहेत.

या महामार्गावर अपघाताची शृंखला संपता संपेना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. महामार्गावरील या भेगांवरून दुचाकी वाहने स्लीप होऊन अपघात होतात. संबंधित विभागामार्फत सुरू असलेले पॅचअपचे काम थातूरमातूर व निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असून संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांच्या कार्यपद्धतीबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यामुळे या महामार्गावरील भेगा बुजविण्यासह पॅचअपचे काम करणाऱ्या कंपनीविरुद्ध कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

गुरूवार दि.११ जून २०२६ | ६

# 1800 घरकुलची वाळू चोरली : आ.पंडितांची तक्रार : कोट्यवधींचा चुना

# पथकाची पहाणी म्हणजे वाळूत... फेस ना पाणी



**बीड/गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील गोदावरी पात्रामधून अवैद्यरित्या बेसुमार वाळूचा उपसा महसूल प्रशासनाच्या आशीर्वादाने होत असून या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी गेवराईचे लोकप्रतिनिधी विजयसिंह पंडित यांनी स्पॉट पंचनामा करत प्रशासनाकडे तक्रार केली त्यानंतर जिल्हा प्रशासनाने महसूल पथकामार्फत पाहणी केली जवळपास १८०० घरकुलधारकांना वाळू पोहोच झाल्याचे दाखवले त्यात गेवराई तालुक्यातील ७४३ लाभार्थ्यांची नावे वाळू दिल्याचे नोंदवले गेले आहे मात्र ही वाळू त्यांना मिळालीच नाही एवढा मोठा भ्रष्टाचार असूनही अद्याप पर्यंत गेवराई तहसीलदार व संबंधित महसूलच्या कर्मचाऱ्यावर कारवाई झालेली नाही याला प्रशासनाची मुख संमती असल्याचा संशय आता बळावला आहे.**

गोदावरी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा केला जातो शासनाने वाळू घाटाचा केलेल्या लिलावाच्या व्यतिरिक्त गेवराईचे तहसीलदार व स्थानिकांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात असून यातून शासनाचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडवला जात आहेत हे सर्व गेवराईचे तहसीलदार खोमणे यांच्या आशीर्वादाने होत असल्याची चर्चा आहे विशेष म्हणजे या अवध्य वाळू उपसाचे प्रकरण माध्यमांनी उचलून धरल्यानंतर गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी राक्षस भुवन व बाळू पट्ट्यामध्ये जाऊन पाहणी केली लिलाव न झालेल्या ठिकाणाहून देखील वाळू उपसा होत असल्याने त्यांनी प्रत्यक्ष पाहून तहसीलदार आणि संबंधित यंत्रणेची जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार केली यानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातून काही पथक तैनात केली या पथकाने ड्रोन द्वारे वाळू उपसा ची माहिती घेतली प्रामुख्याने वाळू उपसा झाला हे यातूनही सिद्ध झाले असेल मात्र ज्या घरकुल लाभार्थ्यांना पाच प्लस वाळू देण्याचे शासनाचे धोरण आहे त्या धोरणाला

## ७४३ लाभार्थ्यांची वाळू विकली तरीही जिल्हाधिकारी गप्प

गेवराई तालुक्यातील ७४३ घरकुल लाभार्थ्यांची यादी उपलब्ध झाली असून या लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू पाहिली तर ३७१५ ब्रास वाळू ही अधिकृत कागदावर घेऊन अनाधिकृत विद्या विकली गेली म्हणजे यापेक्षा अधिक वाळू महसूल विभागाच्या संगनमताने विकली गेली विशेष म्हणजे ही वाळू घरकुलधारकांना ज्या वाहनाद्वारे दिली गेली त्या वाहनाचे नंबर देखील संशयास्पद आहे ही सर्व माहिती अधिकृत असतानाही जिल्हाधिकारी मात्र गप्प का आहे असा प्रश्न निर्माण होतो

हरताळ हसवत महसूल प्रशासनाने ही वाळू वाळू माफिया यांच्या घशात घातली आणि आपली खिशात भरून घेतले हे तेवढेच सत्य आहे गेवराई तालुक्यातील ७४३ घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू वाटप केल्याचे ऑनलाइन दिसत आहे त्यापुढे लाभार्थ्यांचे नाव कोणत्या घाटावरून वाळू दिली कोणत्या वाहनाने आणि किती वाजता वाळू दिली याची नोंद आहे प्रामुख्याने जिल्ह्याच्या महसूल पथकाने केलेल्या पाणी जवळपास ७५ टक्के घरकुल लाभार्थ्यांना वाळूज मिळाली नाही हे दिसून आले असे असतानाही जिल्हाधिकाऱ्यांनी अद्याप का कारवाई केली नाही हा मोठा प्रश्न आहे का प्रत्येकांचे हात यामध्ये गुंतलेले आहेत असा संशय व्यक्त केला जात आहे एका लोकप्रतिनिधी तक्रार प्रत्यक्ष पाहणी मध्ये वाळूचा उपसा पथकाच्या चौकशीत घरकुलधारकांना न मिळालेली वाळू हे सर्व सत्य असतानाही गेवराई तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी ग्रामसेवक यांच्यावर कारवाई का होत नाहीत हा मोठा प्रश्न आहे ग्रामीण भागामध्ये एक मन आहे वाळूत ..... ना पाणी अशी गत होऊ नये केवळ चौकशी आणि पाहणीचा फारच केला जाऊ नाही आता सर्व स्पष्ट असतानाही कारवाई का केली जात नाही असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे गेवराईच्या तहसीलदारांना राष्ट्रवादीच्या एका मंत्र्याचा आशीर्वाद असल्याची चर्चाही सुरू आहे.

## माजलगांव शहर पोलीसांकडून गोवंश कत्तल प्रकरणातील आणखी चार आरोपींना अटक

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील चांदणी ग्राउंडजवळ, मंजरथ रोडच्या बाजुला व जुन्या मसनवट्या जवळील परीसरामध्ये दि ३० मे २०२६ रोजी गोवंशाची कत्तल करुन त्यांचे पाय, मुंडके व इतर अवयव उघड्यावर मिळुन आल्याने पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे गुरनं १७९/२०२६ प्रमाणे दाखल असुन सदर गुन्ह्यामध्ये आरोपी नामे इमरान शकील कुरेशी वय ३८ वर्षे रा. गांधनपुरा, माजलगाव,जफर गफार कुरेशी रा. खाटीक गल्ली, माजलगाव यांना दिं ३१ मे २०२६ रोजी अटक करण्यात आले होते.



सदर गुन्ह्याचा तपास चालु असुन सदर गुन्ह्यामध्ये आज पावेतो एकुण १० आरोपी निष्पन्न करण्यात आलेले असुन दिं ०९ जुन मंगळवार रोजी माजलगाव शहर पोलीसांनी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या सदर गुन्ह्यात निष्पन्न झालेले आरोपी नामे उस्मान नबी कुरेशी वय ५० वर्षे रा.महेबुब नगर, माजलगाव, अबुजर उस्मान कुरेशी वय १८ वर्षे रा.महेबुब नगर, माजलगाव,अलीम उस्मान कुरेशी वय २१ वर्षे रा.महेबुब नगर,माजलगाव, अजीम चुन्नूमिया कुरेशी वय ३२ वर्षे रा.कुरेशी गल्ली, माजलगाव यांचा शोध घेवुन त्यांना सदर गुन्ह्याचे तपास कामी अटक केले असुन त्यांचेकडे अधिक पान ३ वर

## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट

### बीड शहरातील राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणासाठी निधीची मागणी

### बीड शहर, ग्रामीण भागातील विविध विकासकामांबाबतही निवेदन सादर

बीड । प्रतिनिधी

शहरातून जाणाऱ्या सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाढती वाहतूक कोंडी आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन या मार्गाचे मोठ्या नाल्यासह चौपदरीकरण करण्यासाठी निधी मंजूर करावा, अशी मागणी भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. मुंबई येथे झालेल्या भेटीदरम्यान त्यांनी बीड शहर व ग्रामीण भागातील विविध विकासकामांबाबतही सविस्तर चर्चा केली.

**मुख्यमंत्र्यांसमोर मांडले बीडचे प्रश्न**

बीड शहरातील तसेच ग्रामीण भागातील विविध विकासकामांसंदर्भातील प्रस्ताव आणि मागण्यांची पत्रेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आली. दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघातील विकासकामांसह इतर प्रश्न थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडले आहेत. त्यामुळे बीडच्या विकासाला गती मिळण्याची चिन्हे आहेत.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, बीड शहरातून जाणारा सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग जालना रोड आणि बार्शी रोडमार्गे शहराबाहेर जातो. मात्र, या परिसरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण वाढत असल्याने वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी वारंवार ट्रॅफिक जाम होत असून नागरिकांना पान ३ वर



## चकलांबा पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई, ६० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा पोलीस स्टेशनच्या हद्दीत गायकवाड जळगाव व मालेगाव शिवारात दोन वेगवेगळ्या ठिकाणी गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणार्यांवर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ६० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



दिनांक १०/०६/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास गायकवाड जळगाव व मालेगाव खु. शिवारात गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू वाहतुकीवर करणाऱ्या दोन हायवांवर वेगवेगळ्या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी दोन भारत बेन्झ कंपनीचे हायवा जप्त केले असून त्यामध्ये अवैध वाळू वाहतूक करतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहेत. एकूण ६०,३०,००० चा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी १) प्रदीप बंकट कदम(वय २६) रा. सुरळेगाव २) रत्नेश्वर उर्फ बाळू शहादेव खेडकर (वय ३३), रा. चकलांबा, ३) ता. गेवराई, जि. बीड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी कोणताही परवाना नसताना स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी अवैध वाळू वाहतूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.


## नागरिकांना त्रासदायक ठरत असलेली कचराकुंडी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षकांच्या पुढाकाराने हटवली

### वाहतुकीला मिळाला मोकळा श्वास

बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी रोड हा सध्या वाहतूक कोंडीचा हॉटस्पॉट बनला आहे. या मार्गावर सुरू असलेले रस्त्याचे काम, तसेच परिसरातील अनेक मंगल कार्यालयांमुळे वाहनांची मोठी वर्दळ होत असून वारंवार वाहतूक कोंडीची समस्या ये-जा करणाऱ्यांना त्रासदायक ठरत आहे.

याच दरम्यान, एका प्रसिद्ध हॉटेलसमोर रस्त्यालगत ठेवण्यात आलेली कचराकुंडीही वाहतुकीस अडथळा ठरत होती. कचराकुंडी रस्त्याला चिकटून असल्याने वाहनचालकांना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागत होता. परिणामी वाहतुकीचा वेग मंदावत होता आणि कोंडीत भर पडत होती. या समस्येची दखल घेत जिल्हा वाहतूक शाखेचे कर्तव्यदक्ष प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि त्यांच्या सोबत असलेले अंमलदार यांनी तत्काळ कारवाई करत संबंधित कचराकुंडी हटवून सुरक्षित अंतरावर स्थलांतरित केली. या उपाययोजनेमुळे रस्त्यावरील अडथळा दूर झाला असून वाहतूक पूर्वीपेक्षा अधिक सुरळीत झाली आहे. पान ३ वर








# वृक्ष लागवडीसाठी जमिनीच्या उपलब्धतेचे काटेकोर नियोजन करावे- जिल्हाधिकारी

### बीड जिल्ह्यात २९.५० लक्ष रोपे तयार * 'एक शाळा, एक विद्यार्थी, एक झाड' उपक्रम * ३०० कोटी वृक्षारोपणासाठी प्रशासनाची जय्यत तयारी

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय वन धोरण १९८८ च्या उद्दिष्टानुसार राज्याचे वनाच्छादन आणि वृक्षाच्छादन सन २०४७ पर्यंत एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी संपूर्ण राज्यात ३०० कोटी वृक्षारोपण अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यामध्ये आगामी २०२६ च्या पावसाळ्यासाठी प्रशासनाने विभागनिहाय वृक्ष लागवडीचे विशेष उद्दिष्ट निश्चित केले असून, संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी वृक्ष लागवडीसाठी जमिनीच्या उपलब्धतेचे काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात वर्ष २०२६ च्या पावसाळ्यातील वृक्ष लागवड कार्यक्रमाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला उपजिल्हाधिकारी प्रभुदय मुळे, विभागीय वन अधिकारी एस.एम. लखमावाड, प्रादेशिक अधिकारी ए.डी.गरकल यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, वर्ष २०२६ ते २०४७ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवड अभियाना दरम्यान परिणाम आधारित अंमलबजावणी आराखड्याचा अवलंब करणार आहे, ज्यामध्ये वृक्ष १० वर्षापर्यंत जतन व संवर्धनाची तरतूद असणार आहे. जेणेकरून लागवड केलेल्या वृक्षांचे दीर्घकालीन अस्तित्व आणि वाढ सुनिश्चित होण्यास मदत होईल. त्यामुळे जिल्ह्यातील वृक्षारोपण कार्यक्रमात केवळ शासकीय यंत्रणाच नव्हे, तर पर्यावरण स्नेही स्वयंसेवी संस्था यांनाही मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्यात यावे. सर्वच विभागांना नेमून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच शालेय स्तरावर एक शाळा, एक विद्यार्थी, एक झाड हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जनजागृती निर्माण करावी. अशा सूचनाही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केल्या. वर्ष २०२६ ते २०४७ या दीर्घकालीन कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी शासनाने हरित महाराष्ट्र आयोग या विशेष उद्देशीय स्वतंत्र संस्थात्मक यंत्रणेची स्थापना केली आहे. या महत्त्वाकांक्षी अभियानाच्या जिल्हा पातळीवरील प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नियमित देखरेखीसाठी विशेष सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदाची धुरा स्वत: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे असून, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे या समितीचे सह-अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत. तर सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी यांच्याकडे या समितीचे सदस्य सचिव म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिमेसाठी सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणावर रोपनिर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाकडे २० लक्ष तर प्रादेशिक वनविभागाकडे ९.५० लक्ष अशी एकूण २९.५० लक्ष रोपे सध्या उपलब्ध असल्याची माहिती उपवनसंरक्षक श्री. बिराजदार यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे बैठकीत दिली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26